www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : ३ अंक : ४२ सोमवार, दि. २० ऑक्टोबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514





# खांदेश्वर रेल्वे स्टेशन परिसरात अनोखी बॅग सापडल्याने तेथील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी मच्छिंद्र पाटील**

सविस्तर माहिती: बुधवार दिनांक 15 /9 /2025 /रोजी पासून एक अनोखी बॅग खांदेश्वर परिसरात आढळून आल्याने तेथील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते तेथील सुजान नागरिकांनी जागृत होऊन नवी मुंबई कामोठे पोलीस स्टेशन येथे फोन लावून तेथील पोलीस अधिकाऱ्यांना ही बातमी दिली

त्याच वेळी क्षणाचा विलंब न लावता कामोठे पोलीस स्टेशनचे वरिष्ठ अधिकारी विमल बिडवे मॅडम व त्यांची सर्व टीम खांदेश्वर रेल्वे स्टेशन येथे घटनास्थळी पोहोचली व तेथील जागेची पूर्ण पाहणी करण्यात आली तेथील जागेची पूर्ण पाहणी केल्यानंतर त्यांना ही प्रश्न पडला की ही बॅग येथे कोणी ठेवली असेल या बॅग मध्ये काय असेल असे अनेक प्रश्न त्यांना पडत होते त्यानंतर त्यांनी रेल्वे अधिकारी यांना ही



बोलवून घेऊन त्यांनाही या बॅग संदर्भात विचारण्यात आले रेल्वे अधिकाऱ्यांना.

या बॅग संदर्भात आम्हाला काहीच माहित नाही असे स्पष्ट केले मग विमल बिडवे मॅडम येथेच न थांबता त्यांनी बॉम्बस्फोट पथकालाही घटनास्थली बोलून घेतले काही वेळातच बॉम्बस्फोट पथक तेथे हजर झाले त्यांनी त्या बॅगेची तपासणी केली असता त्या बॅगेमध्ये बॉम्ब नसून फक्त कपडेच असल्याचे आढळून आले.

त्यानंतर येथील नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला व त्यांनी पोलिसांचे व बॉम्बस्फोट पथकाचे आभार मानले.

# 'महाज्योती'च्या माध्यमातून होतकरू विद्यार्थ्यांचे स्वप्न साकार करू – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## 'महाज्योती'च्या प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**

**नागपूर :** महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था अर्थात महाज्योतीच्या प्रशासकीय इमारतीचे अनेक वर्षांपासूनचे स्वप्न आज आकारास आले आहे. येत्या काळात ही प्रशासकीय इमारत आधुनिक आणि विद्यार्थ्यांसाठी सर्व सुविधायुक्त ठरणार आहे. आपण इतर मागासवर्ग विभागाची स्थापना केल्यामुळे गती मिळाली. या विभागाच्या माध्यमातून होतकरू नवीन पिढी आकारास येईल तसेच त्यांच्या स्वप्नांना बळ मिळून गगनभरारी घेता येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.सदर येथील जिल्हा नियोजन भवन आवारात महाज्योतीच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.



यावेळी व्यासपीठावर महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, वित्त व नियोजन राज्य मंत्री ॲड. आशिष जयस्वाल, गृह राज्यमंत्री पंकज भोयर, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार सर्वश्री प्रवीण दटके, परिणय फुके, कृष्णा खोपडे, विकास ठाकरे, चरणसिंग ठाकूर, आशिष देशमुख, संजय मेश्राम, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, ओबीसी समाजाला पुढे नेण्यासाठी विविध योजना सुरू केल्या आहेत. यात प्रशिक्षण, स्वयंरोजगार यांचा समावेश आहे. ओबीसी समाजातील मुलांच्या उज्वल भविष्यासाठी महाज्योतीची निर्मिती केली असून याला पुरेसा निधी उपलब्ध केला आहे. आज ओबीसी मुलासाठी 60 पेक्षा जास्त वसतिगृह सुरू करण्यात आली आहेत. महाज्योतीतून प्रशिक्षण घेऊन मुले विविध स्पर्धा परिक्षेत यश संपादन करीत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. ओबीसी समाजाची नॉन क्रिमिलिअर मर्यादा आपण आठ लाखांपर्यंत नेली आहे. ओबीसी समाजाच्या कल्याणसाठी शासन तत्पर असल्याचे ते म्हणाले.

**शैक्षणिक प्रगतीचा पाया घालणारा क्षण – पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महाज्योती संस्थेच्या स्वतंत्र इमारतीची पायाभरणी आज झाली आहे. हा ऐतिहासिक क्षण आहे. नागपूरच्या भूमीवर आता 'महाज्योती'ची भव्य ७ मजली प्रशासकीय इमारत तयार होणार आहे. हा केवळ वास्तूचा नव्हे तर शैक्षणिक प्रगतीचा पाया घालणारा क्षण असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

**ही प्रशासकीय इमारत शिक्षणासह संस्कार आणि संशोधनासाठी आदर्श मापदंड ठरेल – मंत्री अतुल सावे**

नागपूर येथील महाज्योतीच्या प्रशासकीय इमारतीत वाचनालय, समुपदेशन कक्ष, प्रशिक्षण कक्ष, भोजन कक्ष आणि २४८ विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय अशा सर्व सुविधांचा समावेश असणार आहे. ही वास्तू म्हणजे शिक्षण, संस्कार आणि संशोधनाचा पवित्र संगम राहणार आहे. नाशिक येथे देखील महाज्योती संस्थेचे प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी १७४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचे मंत्री श्री. सावे यावेळी म्हणाले. महाज्योती संस्थेतून प्रशिक्षण घेऊन यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रातिनिधिक सत्कार व महाज्योतीच्या यशोगाथा पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आला. तसेच सात मजली प्रशासकीय इमारत बांधकामाची चित्रफीत दाखविण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी केले. आभार मुख्य लेखा अधिकारी प्रशांत वावगे यांनी मानले. तर सूत्रसंचालन दिनेश मासोडकर यांनी केले.


# श्री छत्रपती कारखान्याकडून शेतकऱ्यांची बाकी कपात करणार नसल्याचे स्पष्टीकरण; गाळप होणाऱ्या उसास अनुदान

**दैनिक युवक आधार**
**भवानीनगर, (वार्ताहर)**

येथील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याने सभासदांना दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. येत्या गळीत हंगामात पूर्वहंगामी व सुरू ऊसास प्रतिटन ७५ रुपये, तर खोडव्यास प्रतिटन १०० रुपये अनुदान देण्यात येणार आहे अशी माहिती कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक व उपाध्यक्ष कैलास गावडे यांनी दिली.

शासनाच्या निर्देशानुसार कारखान्याचा गळीत हंगाम १ नोव्हेंबर २०२५ पासून सुरू होणार आहे. मशिनरीचे सर्व ओव्हरहॉलिंग व दुरुस्तीची कामे पूर्ण झाली असून ट्रायल सुरू आहेत यंदा कार्यक्षेत्रात एकूण २३ हजार ७७७ एकर उसाचे क्षेत्र असून त्यात आडसाली १२,६९८ पूर्वहंगामी १,६६१ सुरू २,८३८ व खोडवा ६,५८० एकर इतके क्षेत्र आहे.

आडसालीचे प्रमाण जास्त असल्याने दोन्ही प्लॅन्ट पूर्ण क्षमतेने चालवून आडसाली ऊस लवकर गाळप करण्याचा निर्णय घेतला



आहे मात्र उशिरा गाळप होणाऱ्या सुरू व खोडवा उसासाठी अनुदान देऊन सभासदांचे नुकसान भरून काढण्याचा हेतू आहे असेही त्यांनी सांगितले. कारखान्याकडून यंदा उस बिलातून येणे बाकी कपात केली जाणार नाही तसेच शेअरची बाकी असणार्यांना तीन हंगामांची मुदतवाढ देण्यात आली आहे त्यामुळे सभासदांवर अतिरिक्त आर्थिक ताण पडणार नाही असे स्पष्ट केले.

मागील तीन हंगामांत कार्यक्षेत्रातील दर्जेदार ऊस बाहेर गेल्याने गाळप साखर उताऱ्यावर परिणाम झाला. कारखान्याची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी सभासदांनी चांगल्या प्रतीच्या उसाचा गाळप कारखान्यातच करून सहकार्य करावे, असे आवाहन अध्यक्ष जाचक व उपाध्यक्ष गावडे यांनी केले. यावेळी संचालक ॲड. शरद जामदार, रामचंद्र निंबाळकर, शिवाजीराव निंबाळकर, पृथ्वीराज घोलप, गणपतराव कदम, प्रशांत दराडे, अजित नरुटे, विठ्ठलराव शिंगाडे, अनिल काटे, बाळासाहेब कोळेकर, संतोष मासाळ, निलेश टिळेकर, सतिश देवकाते, अशोक पाटील, मंथन कांबळे, डॉ. योगेश पाटील, तानाजी शिंदे, माधुरी राजपुरे सुचिता सपकळ उपस्थित होते.

# पिलीव व पिलीव भागात दिपावली साठी बहुगर्दी

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी रघुनाथ देवकर**

माळशिरस तालुक्यातील या ठिकाणी दीपावलीच्या निमित्ताने खरेदी विक्रीसाठी नागरिकांनी बहुगर्दी केली असून व्यापारी पेठ श्रीकांतच्या येण्या जाण्याने फुलली असून मोठ्या प्रमाणात आकाश कंदील त्याचप्रमाणे किराणा माल कपडे फटाके इतर सामानाची खरेदी करण्यासाठी

मोठ्या प्रमाणात लगबयग झाल्याने व्यापारी वर्गामध्ये सुद्धा समाधान व्यक्त केले जात आहे.. वर्षातील अति महत्त्वाचा सण




म्हणून माहेरवाशींनी सासुरवाशीने त्याचप्रमाणे उद्योग व्यवसायासाठी बाहेर असलेल्या सर्व नागरिकांनी अतिशय आनंद मध्ये दीपावली साजरी करण्याचा उद्देश मनामध्ये ठेवून आनंदाने पिलीव नगरीमध्ये बहुगर्दी केल्याचे बोलले जात आहे.

# प्रकाशाच्या उत्सवात टिळक रोड परिसर केदार बिल्डकॉन मुळे उजळला

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र झगमगाट सुरु आहे. दिव्यांची आकर्षक रोषणाई ही आता पनवेलची एक वेगळी ओळख होत असतानाच शहरातील टिळक रोड परिसर हा केदार बिल्डकॉन मुळे झगमगला असून अनेकजण या ठिकाणी उभे राहून या रोषणाईचा आनंद घेत आहेत. तर तरुण वर्ग सेल्फी व व्हिडिओ काढून आपला आनंद द्विगुणित करीत आहेत.

या भागात अंत्यत मोठी व जुनी अशी यशोमंगल सोसायटीचे नुकतेच पुनर्विकासाचे काम सुरु झाले आहे. या ठिकाणी पियुष भाई यांचे कार्यालय असलेले केदार बिल्डकॉन ने ही सोसायटी डेव्हलप करायला घेतली आहे. इतर बांधकाम व्यवसायिक हे फक्त आपल्या बिल्डिंगचे बांधकाम बघतात परंतु केदार बिल्डकॉन हे कधीच व्यवसाय न पाहता सामाजिक बांधिलकी जपत परंपरागत सण उत्सव सुद्धा साजरे करतात. या उद्देशानेच आज दिवाळीच्या सणानिमित्त यशोमंगल सोसायटी परिसर हा केदार बिल्डकॉनच्या




माध्यमातून पूर्ण रोषणाई करून त्यांनी आगळा वेगळा उपक्रम राबवला आहे. या भागातील नागरिक तसेच इतर अनेकजण या ठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई पाहण्यासाठी येथे गर्दी करीत आहेत व केदार बिल्डकॉनचे कौतुक करत आहेत. आकर्षक बांधकाम, वाजवी दर व ग्राहकाचे समाधान या तत्वावर केदार बिल्डकॉनचे पनवेल शहर, नवीन पनवेल, वाशी, मुंबई या ठिकाणी मोठं मोठे प्रोजेक्ट कार्यन्वित आहेत.

# २१ ऑक्टोबर रोजी लक्ष्मीपूजन शास्त्रसंमतच!




**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

दरवर्षी कार्तिक महिन्याच्या कृष्ण पक्षातील अमावस्येला दिवाळीचा सण साजरा होतो. धनत्रयोदशीपासूनच याची सुरुवात झाली आहे. दिवाळीच्या दिवशी भगवान गणेश आणि माता लक्ष्मीची पूजा करणे खूप महत्त्वाचे आहे. असे केल्याने व्यक्तीच्या जीवनात सुख-समृद्धी येते आणि धन-धान्यात वाढ होते. पण दिवाळी पूजेच्या वेळी काही विशेष गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. नाहीतर तुमची पूजा अपूर्ण राहू शकते.

२१ ऑक्टोबर रोजी अमावास्या १७:५५ पर्यंत असून, ती तीन प्रहरापेक्षा जास्त आहे, तसेच प्रतिपदा २०:११ वाजता समाप्त होईल. म्हणून, या दिवशी लक्ष्मीपूजन शास्त्रविधानानुसार योग्य आहे.

यासंदर्भात, २१ ऑक्टोबर २०२५ रोजी मंगळवारी सायंकाळी व प्रदोषकाळात (सूर्यास्तानंतर २ तास २४ मिनिटे) लक्ष्मीपूजन करणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले. गेल्या काही वर्षापासून सोशल मीडियावर लक्ष्मीपूजनाबद्दल संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. काही लोक गणित पद्धतीच्या फरकामुळे आणि धर्मशास्त्रीय वचनांचा योग्य अर्थ न लावल्यामुळे २१ ऑक्टोबरऐवजी दुसऱ्या दिवशी लक्ष्मीपूजन करण्याचे संदेश देत आहेत. अशा अफवांपासून दूर राहून ज्याच्याशी आपण आपल्या धार्मिक कृत्यांसाठी पंचांगाचा वापर करतो, त्याच पंचांगानुसार लक्ष्मीपूजन करा.

२१ ऑक्टोबर २०२५ रोजी लक्ष्मीपूजनाचे मुहूर्त दुपारी ३ ते ४:३० आणि सायंकाळी ६ ते ८:४० असा असल्याची माहिती देण्यात आली.

**दिवाळीत लक्ष्मीपूजन का करतात?**

आश्विन वद्य अमावास्येला लक्ष्मीपूजन करण्याची परंपरा आहे. या दिवशी बलीच्या बंदिवासातून लक्ष्मीची सुटका झाली होती आणि त्याच आनंदात लक्ष्मीपूजन केले जाते, अशी एक आख्यायिका आहे. लक्ष्मीचे वास्तव्य आपल्या घरात नेहमी राहावे यासाठी मनोभावे लक्ष्मीपूजन केले जाते. त्याच कारणामुळे व्यापारी लोकही या दिवशी त्यांच्या कामाच्या ठिकाणी लक्ष्मीपूजन करतात. दिवाळीत लक्ष्मीपूजन का केले जाते याबाबत अनेक आख्यायिका प्रचलित आहेत.

**लक्ष्मी पूजनात या गोष्टी लक्षात ठेवा.**

दिवाळीच्या दिवशी देवी लक्ष्मीची पूजा करताना उत्तर दिशेला दिवा लावणे शुभ मानले जाते. तसेच, देवीच्या पूजनात श्रीयंत्र, कौडी आणि गोमती चक्र अवश्य ठेवावे. त्यानंतर, प्रदोष काळात शुभमुहूर्तावर विधी-विधानाने माता लक्ष्मीची पूजा व आरती करावी.

**कोणत्या दिशेला पूजा मांडावी?**

दिवाळीच्या दिवशी पूजा करताना दिशेचे विशेष भान ठेवावे. असे मानले जाते की पूजा नेहमी उत्तर किंवा उत्तर-पूर्व दिशेलाच करावी. संपूर्ण कुटुंबासोबत दिवाळीची पूजा केल्याने घरात सकारात्मक ऊर्जा राहते आणि सर्व सदस्यांवर माता लक्ष्मीची कृपा राहते. तसेच, पूजा करताना या गोष्टीचीही काळजी घ्या की पूजा करणाऱ्या व्यक्तीचे तोंड उत्तर किंवा पूर्व दिशेला असावे.

**देवी लक्ष्मीची मूर्ती कशी असावी**

दिवाळीच्या दिवशी देवी लक्ष्मीची मूर्ती घेताना या गोष्टीची काळजी घ्यावी की देवी बसलेल्या स्थितीत असावी आणि तिच्या हातातून धन बरसताना दाखवले असावे. तसेच, माता लक्ष्मीने लाल रंगाचे वस्त्र परिधान केलेले असावे आणि ती कमळाच्या आसनावर विराजमान असावी. अशा प्रकारची देवीची मूर्ती घरी आणणे खूप शुभ मानले जाते.

**दिवाळी पूजेसाठी कोणत्या देवांची मूर्ती घ्यावी**


दरवर्षी दिवाळी पूजेसाठी आपण लक्ष्मी आणि गणेश यांच्या मूर्ती विकत घेतो. त्यावेळी या गोष्टीची काळजी घ्यावी की मूर्ती मातीच्या असाव्यात आणि माता लक्ष्मी व गणेशजी यांच्या मूर्ती एकत्र जोडलेल्या नसाव्यात. लक्ष्मी-गणेश यांच्या मूर्ती घेताना या गोष्टी लक्षात ठेवणे खूप महत्त्वाचे आहे. तसेच, जुन्या मूर्ती वाहत्या पाण्यात विसर्जित कराव्यात. दोन्ही मूर्ती वेगवेगळ्या घेऊन त्यांची चौरंगावर मांडणी करून विधिवत पूजा करावी.

**अशी आहे यंदाची दीपावली**

1) गुरु द्वादशी, धनत्रयोदशी, यमदीपदान : १८ ऑक्टोबर २०२५, शनिवार
2) नरक चतुर्दशी, अभ्यंग स्नान, यम तर्पण : २० ऑक्टोबर २०२५, सोमवार
3) लक्ष्मीपूजन : २१ ऑक्टोबर २०२५, मंगळवार
4) लक्ष्मीपूजन मुहूर्त: २१ ऑक्टोबर २०२५, मंगळवार दुपारी ३ ते ४:३०, सायं. ६ ते ८:४०
5) वहीपूजन मुहूर्त : २२ ऑक्टोबर २०२५, बुधवार
6) यमद्वितीया (भाऊबीज) : २३ ऑक्टोबर २०२५, गुरुवार

## पुणे येथील संचेती हॉस्पिटलच्या ब्रँड अँबेसिडरपदी सय्यद शहानवाज यांची निवड




**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** आर्थो मध्ये देशात प्रसिद्ध असलेले पुणे येथील संचेती हॉस्पिटल यांच्या ब्रॅन्ड अँबेसिडर म्हणून सय्यद शहानवाज अब्दुल्ला यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सय्यद शहानवाज हे एक सामान्य कुटुंबातील व्यक्ती असुन संचेती हॉस्पिटलचे डॉ.पराग संचेती यांनी एवढा मोठा मान दिल्याने पाटोद्यासह परिसरातुन डॉॅ.पराग संचेती यांचे आभार व सय्यद शहानवाज यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. काही महिन्यांपासून संचेती हॉस्पिटलचे तज्ञ डॉक्टर पाटोदा येथील डॉ.रविंद्र राजपुरे यांच्या हॉस्पिटलमध्ये अस्थी रोगाने त्रस्त असलेल्या रुग्णांना सेवा देत असुन ही सेवा उपलब्ध करून देण्यात सय्यद शहानवाज यांचा सिंहांचा वाटा असुन त्यांच्या वर मोठी जबाबदारी देण्यात यावी अशी इच्छा ही सर्वसान्यांची होती अखेर डॉ.पराग संचेती यांनी मोठी जबाबदारी सय्यद शहानवाज यांच्या वर सोपवली असल्याने सय्यद शहानवाज यांची नियुक्ती झाल्याने त्यांचे सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले असून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# दिवाळीचा झगमगाट: दादरचा घरगुती फराळ आणि माटुंग्याचे कंदील ठरले आकर्षणाचे केंद्र

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर मुंबई विभाग प्रमुख**

**मुंबई :** दिवाळीचा सण जवळ येताच संपूर्ण मुंबई उजळून निघाली आहे. दादर आणि माटुंगा परिसरात पारंपरिकतेचा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम अनुभवायला मिळत आहे. एकीकडे घरगुती फराळाचा सुगंध दरवळतोय, तर दुसरीकडे रंगीबेरंगी कंदिलांच्या प्रकाशात सणाचा आनंद उजळतोय.

दादर कबूतरखाना परिसरात मयूर धुरी यांनी उभारलेला घरगुती दिवाळी फराळाचा स्टॉल सध्या ग्राहकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे. करंजी, चकली, शेव, चिवडा, लाडू, अनारसे, शंकरपाळे अशा विविध पारंपरिक पदार्थांच्या चवीचा आस्वाद घेण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे.




“घरगुती चवीतून जुन्या आठवणींना उजाळा देण्याचा आणि शुद्धतेचा विश्वास देण्याचा आमचा प्रयत्न आहे,” असे मयूर धुरी सांगतात.

पूर्वी प्रत्येक घरात दिवाळीचा फराळ घरच्याघरी तयार होत असे; पण आता नोकरी, व्यवसाय आणि वेळेअभावी अनेकजण बाहेरून घरगुती फराळ खरेदी करणे पसंत करतात. “आता घरी कोणी फराळ बनवत नाही, पण घरगुती चव हवीच असते,” असे सांगत अनेक महिला या स्टॉलवरून खरेदी करताना दिसतात. त्यामुळे अशा स्टॉलना चांगला प्रतिसाद मिळत असून, धुरी यांनी पुढील काळात हा उपक्रम नियमित स्वरूपात सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, माटुंगा सिटीलाइट सिनेमा परिसरात वैभव पेंडणेकर यांच्या कंदील स्टॉलवर सध्या दिवाळीचा झगमगाट झळकत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही त्यांनी घरगुती पद्धतीने बनविलेले पारंपरिक तसेच आधुनिक डिझाईनचे कंदील विक्रीसाठी ठेवले आहेत.कागद, बांबू, प्लास्टिक आणि पर्यावरणपूरक साहित्यापासून बनविलेले विविध आकारातील कंदील ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. “दरवर्षी काहीतरी नवे देण्याचा प्रयत्न करतो. यंदा फोल्डेबल डिझाईन आणि एलईडी लाइटसह येणारे कंदील ग्राहकांना विशेष आवडत आहेत,” असे पेंडणेकर सांगतात.

ग्राहकांमध्ये देखील उत्सुकता ओसंडून वाहत आहे. “गेल्या वर्षी घेतलेला कंदील अजून टिकतोय, पण तरीही नवीन काहीतरी डिझाईन घ्यावेसे वाटते,” असे अनेकांनी सांगितले. संध्याकाळच्या प्रकाशात हा परिसर रंगीबेरंगी उजळतो, तर दिवसभरही येथे खरेदीसाठी नागरिकांची लगबग सुरू असते.

सोशल मीडियावर “माटुंग्याचे कंदील बाजार” म्हणून या ठिकाणाची चर्चा रंगली आहे. मुंबई, ठाणे आणि उपनगरांमधून नागरिक खरेदीसाठी येथे येत असून, कुटुंबांसह खरेदीचा आनंद घेताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर झळकणारा आनंद आणि उत्साह “दिवाळी आली रे!” अशीच भावना जागवतो आहे.

# भाजप युवा नेते विक्रम साबळे जन्मदिन अभिष्टचिंतन निमित्ताने विविध उपक्रम

## मोफत आरोग्य तपासणी,रक्तदान शिबिरासह भजनी मंडळाचे सन्मान

**दैनिक युवक आधार**

**खोपोली वार्ताहर**

विक्रम साबळे फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम वर्षभर राबविले जात असतात त्यात 19 ऑक्टोंबर रोजी भाजपा युवा नेते विक्रम साबळे यांचा जन्मदिन अभिजीत निमित्ताने शहरात समाज उपयोगी विविध कार्यक्रमातून सेवा कार्य करण्यात आले यावेळी महाराजा मंगल कार्यालयामध्ये नागरिकांसाठी आरोग्याच्या दृष्टिकोनातून वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हावी या उद्देशाने मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले .यात शेकडो हून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला.आरोग्य शिबिराचा लाभ सर्वांना मिळावे यासाठी अनेक नागरिकांच्या अडीअडचणी वर्षभर सोडवता येतील अश्या पध्दतीने नियोजन करण्यात आले .यात मेडिकव्हर हॉस्पिटल नविमुंबई खारघर व्यवस्थापनाच्या वैद्यकीय टीम ने विशेष कार्य करून शिबीर यशस्वी केले. या शिबिरामध्ये शारीरिक वैद्यकीय चाचण्या ,तपासण्या करून उपचार देण्यात आले . यावेळी अनेक भजनी मंडळ वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ श्रेष्ठांचा सन्मान करण्यात आला. खोपोली शहरातील सामाजिक ,राजकीय क्षेत्रातील अनेक मंडळींनी उपस्थिती दाखवत विक्रम साबळे यांना जन्मदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. मान्यवरांनी खोपोलीकरांसाठी अभिनव उपक्रम राबवणाऱ्या विक्रम साबळे यांच्या संपूर्ण टीमचे कौतुक करून त्यांना पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



विक्रम साबळे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य तपासणी

यावेळी वारकरी संप्रदाय रायगड भूषण हभप रामदास पाटील,भाजप नेते दीपक बेहरे, माजी नगराध्यक्ष दत्तात्रय मसुरकर,माजी उपनगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, डॉ.सुनील पाटील यांच्या सह शहरातील अनेक सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी व आजी-माजी लोकप्रतिनिधींनी हजेरी लावली .

युवा नेतृत्व करणाऱ्या विक्रम साबळे यांना शुभेच्छा देण्यासाठी खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक व त्यांच्यासोबत खोपोली पोलीस निरीक्षक सचिन हिरे,पत्रकार वर्ग हि मोठया संख्येने उपस्थित होते. ज्यावेळी ज्येष्ठ समाजसेवक उद्योजक यशवंत शेठ साबळे यांनी विक्रम साबळे फाउंडेशनच्या वतीने येणाऱ्या सर्व मान्यवरांचे स्वागत, सन्मान करून आभार मानले

# सावंतवाडी रेल्वे टर्मिनससाठी आमदार अनंत (बाळा) नर यांचा मुख्यमंत्रींकडे पाठपुरावा

## कोकण रेल्वे प्रवासी संघटनेचा पुढाकार – कोकणी चाकरमान्यांचा पुन्हा एकदा एल्गार !


**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तरळा–वारगाव गावचे सुपुत्र आणि जोगेश्वरी (पूर्व) विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री अनंत (बाळा) नर यांनी सावंतवाडी येथील अपूर्ण असलेले रेल्वे टर्मिनस मार्गी लावण्यासाठी तसेच या ठिकाणी कोकण रेल्वेकडून मंजूर झालेल्या गाड्यांच्या थांब्यांना रेल्वे बोर्डाची मंजुरी मिळावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे मागणी केली आहे.

या मागणीसाठी कोकण रेल्वे प्रवासी संघटना, सावंतवाडी शाखेचे श्री संदीप गुरव, शाखाप्रमुख नंदकुमार ताम्हणकर, उपशाखाप्रमुख शैलेश बांदेलकर, श्री केशव पांचाळ, राजापूर तालुका सहसंपर्क प्रमुख जगन्नाथ कदम, श्री विश्वजीत जगताप आणि श्री विलास मोहिते यांनी पुढाकार घेतला आहे.

आमदार नर यांनी पत्रात नमूद केले आहे की, सावंतवाडी येथे टर्मिनस आणि कोचिंग डेपो सुरू झाल्यास कोकणातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल. कोकण रेल्वे मार्गावरील अनेक गाड्या सध्या पूर्ण क्षमतेने चालत असून, वाढत्या गर्दीमुळे नवीन टर्मिनसची गरज आहे.



कोकण रेल्वे प्रवासी संघटना, सावंतवाडी

प्रवाशांच्या हक्कांसाठी लढा, सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवासाचा ध्यास!


पत्ता: जी-१२६, विजयश्री, उभाबजार, सावंतवाडी, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग महाराष्ट्र, ४१६५१०.

संपर्क:- ॲड. संदीप निंबाळकर, सागर तळवडेकर ईमेल:- swaditerminus@gmail.com

दिनांक: ८/१०/२०२५

प्रति,
मा. श्री. अनंत (बाळा) नर,
आमदार,
जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघ
मुंबई, महाराष्ट्र.

विषय: कोकणातील सावंतवाडी येथे प्रस्तावित रेल्वे टर्मिनस पूर्ण करणे आणि तुतारी एक्सप्रेसच्या धर्तीवर अजून दादर ते सावंतवाडी रेल्वे गाडी सुरु करणे बाबत.





तसेच, सावंतवाडी टर्मिनस कार्यान्वित झाल्यास या परिसराचा पर्यटन व औद्योगिक विकास वेगाने होईल आणि स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

कोकण रेल्वे प्रवासी संघटनेच्या पुढाकाराने ही मागणी पुन्हा एकदा जोर धरत असून, “परिपूर्ण सावंतवाडी टर्मिनस व रेल्वे थांबे हवेच” या मागणीसाठी कोकणी चाकरमान्यांचा एल्गार पुन्हा उमटू लागला आहे.

## आपत्तीव्यवस्थापन तज्ञ,प्रा.डॉ.जयपाल पाटील यांचा दिल्लीत सन्मान



**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख**

**एम.डी.भोईर**

**अलिबाग :**-पं.दीनदयाळ उपाध्याय हिंदी विद्यापीठ वृंदावन मथुरा उत्तर प्रदेश तर्फे हिंदी परिसंवाद आणी विद्यावाचस्पती सन्मान कार्यक्रमाचे भव्य आयोजन रविवार दिनांक २६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते ३.३०पर्यंत हॉटेल रेडीसन ब्ल्यू पश्चिम विहार नवी दिल्ली येथे आपत्तीव्यवस्थापन चे देशभरात प्रशिक्षण व समाज सेवे बाबत ऑननरी डॉक्टरेट देवुन प्रा.डॉ.जयपाल पाटील यांचा सन्मान होणार आहे.या कार्यक्रमास प्रमुखपाहुणे पदश्री डॉ.अरविंद कुमार, राणी लक्ष्मीबाई केंद्रीय कृषी विश्व विद्यालय झांसी,कार्यक्रम अध्यक्ष डॉ.ईनदु भूषण मिश्रा,कुलपती पं दीनदयाळ उपाध्याय हिंदी विद्यापीठ ,प्रमुख वक्ते डॉ.ऋतु दुबे तिवारी ज्येष्ठ साहित्यिक, गाझियाबाद सन्माननीयपाहुणेडॉ.विश्वनाथ पाणीग्रही राष्ट्रीय पर्यावरण तज्ज्ञ जागतिक विक्रमवीर, बागबाहरा छत्तीसगड ईत्यादी मान्यवरांच्याउपस्थितीत कार्यक्रम होणार आहे.यामधे हॉटेल रेडीसन ब्ल्यू मधे सकाळी ११ ते११.३० नोंदणी,११.४५ पर्यंत दीपप्रज्वलन,१२ ते १२.३० सन्मान सोहळा,सन्मानपत्र वितरण,१.४५पर्यत पाहुण्यांना सन्मान चिन्ह सादर करणार, दुपारी २ नंतर स्नेहभोजन होउन समारोप होणार. असल्याची माहिती कार्यक्रम संयोजक डॉ.एस.प्रकाश यांनी दिली.

# बालकर्करोगग्रस्तांसाठी खारघरसह मुंबईत पाच नवीन केंद्रांचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर**

बालकर्करोगाशी झुंज देणाऱ्या कुटुंबांना सर्वांगीण मदत पुरविण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल म्हणून, एच. टी. पारेख फाउंडेशन आणि सेंट ज्यूड इंडिया चाइल्डकेअर सेंटर्स यांच्या संयुक्त विद्यमाने खारघरसह मुंबईत पाच अत्याधुनिक निवासी केंद्रांचे उद्घाटन करण्यात आले. टाटा मेमोरियल सेंटरच्या ‘ॲडव्हान्स्ड सेंटर फॉर ट्रीटमेंट, रिसर्च अँड एज्युकेशन इन कॅन्सर’ या संकुलात उभारण्यात आलेली ही केंद्रे दुर्बल कुटुंबांना सुरक्षित व सन्मानजनक आधार देण्याच्या दिशेने मोठी झेप ठरली आहे. या उद्घाटन सोहळ्याला एच. टी. पारेख फाउंडेशनचे अध्यक्ष दीपक एस. पारेख, सेंट ज्यूड्स इंडियाच्या अध्यक्षा मनीषा पार्थसारथी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल नायर उपस्थित होते. दोन्ही संस्थांच्या टीम सदस्यांनीही या वेळी सहभाग घेतला.



या पाच नव्या केंद्रांपैकी दोन केंद्रे केवळ अस्थिमज्जा प्रत्यारोपण रुग्णांसाठी राखीव असतील. या सर्व केंद्रांमधून दरवर्षी १३० कुटुंबांना मोफत, स्वच्छ आणि सुरक्षित निवासाची सोय उपलब्ध करून दिली जाईल. निवासाबरोबरच पोषक आहार, समुपदेशन, शैक्षणिक सहाय्य आणि प्रवासाची सोयही पुरवली जाणार आहे. या सर्व सुविधांमुळे उपचार घेत असलेल्या मुलांसाठी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी हे खऱ्या अर्थाने “घरापासून दूर, पण आपलेसे घर” ठरेल. रुग्णकेंद्री उपक्रमांना बळकटी देण्यासाठी एच. टी. पारेख फाउंडेशनने एसीटीआरईसी केंद्रात आणखी काही मूलभूत सुविधा उभारल्या आहेत. त्यात तीन नव्या लिफ्ट्सची बसवणूक, पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापन प्रणाली, कंपोस्टिंग युनिट्स आणि इमारतीच्या हिरवाई क्षेत्राचा काही भाग विकसित करण्यासाठी निधीचा समावेश आहे. या उपक्रमांमधून प्रत्येक कुटुंबाच्या सन्मान व सोयीसाठी दीर्घकालीन आणि शाश्वत उपाय उपलब्ध करून देण्याच्या फाउंडेशनच्या ध्येयाची पुष्टी होते.

ही पाच केंद्रे सेंट ज्यूड्सच्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या प्रकल्पाचा एक भाग आहेत. १२ मजली आणि २३४ युनिट्स असलेले हे विशाल संकुल पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यावर दरवर्षी सुमारे ७०० कुटुंबांना मोफत निवास उपलब्ध करून देईल. पुढील वीस वर्षांत या सुविधेचा लाभ सुमारे ३५ हजार व्यक्तींना होण्याचा अंदाज आहे. एच. टी. पारेख फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी झिया लालकाका यांनी सांगितले, “सेंट ज्यूड्ससोबतचा आमचा संबंध दशकभरापूर्वी सुरू झाला. आम्ही त्यांचे देशभरातील विविध केंद्रांचे संचालन समर्थित केले आणि नंतर मुंबईतील कॉटन ग्रीन येथील केंद्राला सहाय्य केले. आता खारघर येथील त्यांच्या सर्वात मोठ्या संकुलाच्या उद्घाटनाच्या प्रसंगी त्यांच्यासोबत उभे राहणे आमच्यासाठी अभिमानास्पद आहे.

# पावसात भिजली शेती, मंदीत हरवली दिवाळी – विंचूरचा बाजार ठप्प!

**दैनिक युवक आधार**

**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर** -अवकाळी पावसाने पिकांचे मोठे नुकसान; कवडीमोल दरांमुळे शेतकरी व सर्वसामान्य ग्राहक आर्थिक संकटातदिवाळी अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेली असताना, विंचूर बाजारपेठांमध्ये दरवर्षी दिसणारा खरेदीचा उत्साह यंदा 'शुकशुकाट' आणि 'मंदीच्या सावटाखाली आला आहे. अवकाळी पाऊस आणि शेतमालाला मिळालेल्या कवडीमोल दरांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले असून, त्याचा थेट परिणाम शहरातील दिवाळीच्या खरेदीवर दिसत आहे.

अवकाळीचा मोठा फटका:


मागील काही दिवसांत जिल्ह्यातील अनेक भागांत झालेल्या अवकाळी पावसामुळे काढणीला आलेल्या खरीप पिकांचे (उदा. , सोयाबीन, द्राक्ष, कांदा) मोठे नुकसान झाले आहे. पीक सडले, भांडवल बुडाले: शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास या पावसाने हिरावून घेतला. अनेक ठिकाणी उभे पीक शेतातच सडून गेले, ज्यामुळे वर्षभराची मेहनत आणि लागवडीचा खर्चही वसूल झाला नाही. कमी दरांची दुहेरी मार: दुसरीकडे, बाजारपेठेत जो थोडाफार माल येत आहे, त्याला कमी दर मिळत आहेत. विशेषतः कांद्याच्या दरात मोठी घसरण झाली असून, लागवडीचा खर्चही निघत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे शेतकरी हवालदिल,

व्यापाऱ्यांवर परिणाम:

शेतकऱ्यांचे उत्पन्न पूर्णपणे घटल्यामुळे, ग्रामीण भागातील क्रयशक्ती संपुष्टात आली आहे. परिणामी, दिवाळीसाठी आवश्यक असलेल्या कपडे, फराळाचे साहित्य, दागिने आणि सजावटीच्या वस्तूंसाठी ग्राहक बाजारपेठेकडे फिरकत नाहीत.

व्यापाऱ्यांची चिंता वाढली: "दिवाळीच्या काळात नेहमी ग्राहक खरेदीसाठी गर्दी करत असतात,





पण यावर्षी पाऊस आणि शेतकरी संकटात असल्याने ग्राहकच नाहीत. माल पडून आहे," अशी चिंता शहरातील व्यापाऱ्यांनी व्यक्त केली.

पावसाने खरेदीत अडथळा: ऐन खरेदीच्या मुहूर्तावर झालेल्या जोरदार पावसामुळे रस्त्यावरील लहान विक्रेते (रांगोळी, आकाशकंदील, पणत्या विकणारे) यांचे मोठे नुकसान झाले, तसेच खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांचाही हिरमोड झाला.

सामान्य नागरिकांवर महागाईचा ताण:

उत्पन्न घटले असतानाच, महागाईने मात्र आपले डोके वर काढले आहे. खाद्यतेल, किराणा आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या दरात वाढ झाल्याने सामान्य कुटुंबांचे बजेट कोलमडले आहे. परिणामी, 'दिवाळी साधेपणाने साजरी' करण्यावर अनेकांनी भर दिला.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## भारतातील सर्वात मोठ्या रेडिएशन थेरपी सुविधांपैकी एक

# नवी मुंबईतील टाटा मेमोरियल सेंटर येथे उभारण्यासाठी ₹625 कोटी देण्याचे आयसीआयसीआय बँकेचे आश्वासन

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

या इमारतीचा भूमिपूजन सोहोळा आणि पायाभरणी आज करण्यात आली. नवी मुंबई(प्रतिनिधी) कर्करोगावरील उपचार, संशोधन आणि शिक्षणासाठी खारघर नवी मुंबईतील टीएमसीच्या प्रगत केंद्रात नवीन कॅन्सर केअर इमारतीचे बांधकाम सुरू करण्याची घोषणा आयसीआयसीआय बँक आणि टाटा मेमोरियल सेंटरने केली. बँकेच्या सीएसआर उपक्रमांतर्गत 625 कोटी रुपयांच्या योगदानाच्या साहाय्याने हे केंद्र भारतातील सर्वात मोठ्या रेडिएशन थेरपी केंद्रांपैकी एक असेल. तसेच अत्याधुनिक कर्करोग उपचार तंत्रज्ञानाने सुसज्ज असेल. महाराष्ट्रातील नवी मुंबई, पंजाबमधील मुल्लानपूर (नवीन चंदीगड) आणि आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे प्रत्येकी एक अशा तीन अत्याधुनिक कॅन्सर केअर इमारतींच्या उभारणीसाठी बँकेने टीएमसीला ₹1,800 कोटी देण्याचे आश्वासन दिले असून, हे केंद्र हा त्याचाच एक भाग आहे.

'आयसीआयसीआय फाउंडेशन ब्लॉक फॉर रेडिएशन ऑन्कोलॉजी' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीचे भूमीपूजन तसेच पायाभरणीचा समारंभ आज करण्यात आला. आयसीआयसीआय बँकेचे अध्यक्ष श्री. प्रदीप कुमार सिन्हा, श्री. संदीप बत्रा, कार्यकारी संचालक, आयसीआयसीआय बँक; श्री. अजय गुप्ता, कार्यकारी संचालक, आयसीआयसीआय बँक आणि डॉ. सुदीप गुप्ता, संचालक, टीएमसी हे यावेळी उपस्थित होते.

तळमजला तसेच दोन बेसमेंट असलेली ही 11 मजली इमारत 3.4 लाख चौ. फुटांवर बांधली जाईल. यामध्ये 12 अत्याधुनिक लिनियर एक्सीलरेटर्स (LINACs) आणि कर्करोगाशी संबंधित इतर प्रगत उपकरणे असतील. LINACs कर्करोगाच्या पेशींना अचूक रेडिएशन देतात ज्यामुळे आसपासच्या निरोगी ऊतींचे नुकसान कमी होते.




'आयसीआयसीआय फाउंडेशन ब्लॉक फॉर रेडिएशन ऑन्कोलॉजी' दरवर्षी 7,200 रुग्णांना रेडिएशन थेरपीची सोय उपलब्ध करून देईल. या अंतर्गत रुग्णांची दोन लाखांहून अधिक रेडिएशन सत्रांची सोय केली जाईल. या व्यतिरिक्त, वर्षभरात 25,000 नवीन रुग्णांना ओपीडी सल्ला तसेच निदान करण्यास मदत करेल. हे केंद्र 2027 पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. आयसीआयसीआय बँकेची सीएसआर शाखा, आयसीआयसीआय फाऊंडेशन फॉर इन्क्लुजिव्ह ग्रोथ, या केंद्राचे बांधकाम आणि एकूणच कामकाजावर देखरेख ठेवेल.

या प्रसंगी आयसीआयसीआय बँकेचे अध्यक्ष श्री. प्रदीप कुमार सिन्हा म्हणाले, "आयसीआयसीआय फाउंडेशन फॉर इन्क्लुझिव्ह ग्रोथ या आपल्या सीएसआर शाखेद्वारे आयसीआयसीआय बँक आरोग्यसेवा, पर्यावरण संवर्धन, शाश्वत उपजीविका आणि सामुदायिक विकास प्रकल्प या चार संकल्पनांवर काम करते आहे. देशातील महत्त्वाच्या आरोग्यसेवा पायाभूत सुविधांना बळकटी देण्याच्या आमच्या ध्येयाशी सुसंगत असलेल्या कर्करोग काळजी मोहिमेत टीएमसीसोबत भागीदारी करताना आम्ही आनंदी आहोत. हे केंद्र पूर्ण झाल्यानंतर आणि संपूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर 'आयसीआयसीआय फाउंडेशन ब्लॉक फॉर रेडिएशन ऑन्कोलॉजी' रेडिएशन थेरपीसाठी भारतातील सर्वात मोठ्या केंद्रांपैकी एक असेल. यामुळे समाजात मोठ्या संख्येने गरज असलेल्या समुदायांना प्रगत रेडिएशन थेरपीची उपलब्धता लक्षणीयरीत्या वाढेल."

आयसीआयसीआय बँकेचे कार्यकारी संचालक श्री. संदीप बत्रा म्हणाले, "देशातील कर्करोगासाठी आवश्यक आरोग्यसेवा पायाभूत सुविधांना पाठिंबा देण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. विशाखापट्टणम, नवी मुंबई आणि मुल्लानपूर येथे तीन नवीन कँसर केअर रुग्णालये स्थापन करण्यासाठी टाटा मेमोरियल सेंटरला ₹1,800 कोटी देण्याचे आमचे आश्वासन आहे. विशाखापट्टणम येथील नवीन ब्लॉकचे बांधकाम चार महिन्यांपूर्वी सुरू झाले आहे. तर नवी मुंबईतील ही नवीन इमारत अत्याधुनिक आरोग्य सुविधांनी सुसज्ज असेल. सल्ला देण्याबरोबरच आजाराचे निदान करणे यामुळे या केंद्रातील रेडिएशन उपचारांची सध्याची क्षमता सहा पटीने वाढवेल. कर्करोगावरील उपचार अधिक प्रगत करण्यासाठी तसेच रुग्णांसाठी ते अधिक सुलभ करण्यासाठी टीएमसीसोबत काम करण्याचा आम्हाला अभिमान आहे."

नवी मुंबई, नवीन चंदीगड आणि विशाखापट्टणम येथे तीन नवीन ब्लॉक्स स्थापन करण्यासाठी आयसीआयसीआय फाउंडेशन फॉर इन्क्लुझिव्ह ग्रोथने दिलेल्या भक्कम पाठबळासाठी टाटा मेमोरियल सेंटरचे संचालक डॉ. सुदीप गुप्ता त्यांचे मनापासून आभार मानतात. ते म्हणाले, "या सुविधांमुळे वंचित रुग्णांना अत्याधुनिक, पुरावा आधारित उपचार पद्धतीमुळे उपचारांना प्रतिसाद लगेच कळेल आणि येणाऱ्या वर्षांसाठी आमची कार्यक्षमता लक्षणीयरीत्या वाढेल. हे ब्लॉक लहान मुलांना तसेच प्रौढांना होणाऱ्या ब्लड कॅन्सरसाठी (रक्ताचा कर्करोग) उत्कृष्टता केंद्रे स्थापन करतील. तसेच भारतातील सर्वात मोठ्या रेडिएशन ऑन्कोलॉजी सुविधांपैकी ते एक असतील. देशभरातील सर्वाधिक गरजू कर्करोग रुग्णांना अत्याधुनिक, काळजीवाहू उपचार प्रदान करण्याच्या आमच्या वचनबद्धतेला ही केंद्रे बळकटी देतील."

ॲक्ट्रेकचे संचालक डॉ. पंकज चतुर्वेदी म्हणाले, "या सुविधेमुळे टाटा मेमोरियल सेंटरमधील एक युनिट - ॲडव्हान्स्ड सेंटर फॉर ट्रीटमेंट, रिसर्च अँड एज्युकेशन इन कॅन्सर (ACTREC) हे परवडणाऱ्या किमतीत अत्याधुनिक उपचार देऊ शकतील. कर्करोगाचे वाढते रुग्ण पाहता देशात तातडीने आवश्यक असलेल्या वैद्यकीय, तांत्रिक आणि पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांच्या शिक्षण आणि प्रशिक्षणासाठी देखील याचा वापर केला जाईल. संस्थेच्या क्लिनिकल आणि ट्रान्सलेशनल रिसर्च क्षमतेसाठी हे मोठे प्रोत्साहन ठरेल."

टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे संचालक डॉ. सी.एस. प्रमेश म्हणाले, "अत्याधुनिक रेडिएशन उपचार पायाभूत सुविधांचा समावेश असलेल्या ACTREC मध्ये नवीन कर्करोग सुविधा स्थापन करण्यासाठी आम्ही आयसीआयसीआय फाउंडेशन आणि आयसीआयसीआय बँकेचे आभारी आहोत.

या आर्थिक मदतीसाठी आम्ही त्यांना मनापासून धन्यवाद देतो. विशेष म्हणजे, केवळ आर्थिक मदत करून ते थांबले नाहीत तर या संपूर्ण प्रक्रियेत त्याचा सहभाग आहे. मुख्य म्हणजे त्यांनी प्रत्यक्ष काम देखील केले आहे. त्यांचे हे सहकार्य भागीदारी देशभरातील रुग्णांना लाभदायक ठरणारे समान, अत्याधुनिक कर्करोग उपचार आणि अत्याधुनिक संशोधन प्रदान करण्याच्या आमच्या सामायिक वचनबद्धतेला बळकटी देते."

आयसीआयसीआय फाऊंडेशन ब्लॉक फॉर रेडिएशन ऑन्कोलॉजीमध्ये याचा समावेश:

- अचूक थेरपीसाठी प्रगत रेडिएशन उपकरणे
- बाहेरील तसेच रुग्णालयातील रुग्णांसाठी एमआरआय, सीटी स्कॅनर, सीटी सिम्युलेटर सारख्या रेडिओलॉजी सुविधा
- वैद्यकीय व्यावसायिकांसाठी संशोधन आणि प्रशिक्षण सुविधा

## प्राचीन व आधुनिक शिक्षण पद्धतीतील सहसंबंधावर मार्गदर्शन कार्यक्रम जिल्हा परिषद हायस्कूल, पाचगाव येथे उत्साहात पार पडला

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सतीश कडू**
**संपादक नागपूर विभाग**

**पाचगाव :** ऑक्टोबर जिल्हा परिषद हायस्कूल, पाचगाव येथे "प्राचीन शिक्षण पद्धती व आधुनिक शिक्षण पद्धती यामधील सहसंबंध" या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रम संपन्न झाला. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल व्यापक दृष्टीकोन निर्माण व्हावा, यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य जी.आर.मोटघरे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून एडुसन फाऊंडेशनचे संचालक डॉ. निलेश काळे उपस्थित होते. डॉ काळे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना प्राचीन शिक्षणपद्धतीतील नैतिक मूल्ये व तत्त्वे आधुनिक जीवनात कशी उपयुक्त ठरतात याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी गुरुकुल प्रणाली, नैतिक शिक्षण, व्यावहारिक जीवनकौशल्ये या गोष्टींवर सविस्तर प्रकाश टाकला. डॉ. काळे यांनी सांगितले की, "आजच्या विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक यशाकडे न पाहता, सहनुभूती, आदरभाव, जबाबदारी आणि नैतिक मूल्ये अंगीकारली तरच ते खरे अर्थाने यशस्वी होतील." योग्य जीवन कौशल्य आत्मविश्वास निर्माण करतो व यशाचा मार्ग सोपा होतो.



त्याचबरोबर शालेय विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा अती वापर करण्याऐवजी वाचनाचे प्रमाण वाढविण्याकरिता डॉ काळे यांनी मुलांना प्रोत्साहित केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती रंदई मॅडम व श्रीमती भोयर मॅडम यांनीही उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षणातील मूल्यांची जाणीव करून दिली.

कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या संस्कृत श्लोक पठणाने अत्यंत भावपूर्ण वातावरणात झाली. या श्लोकांमधून प्राचीन संस्कृतीतील ज्ञानसंपदा आणि जीवनदृष्टीचे दर्शन घडले. कार्यक्रमाचे दर्शन घडले. कार्यक्रमाचे संचालन व आभार गोपाल ढोबळे यांनी केले.

## शासकीय सेवेतील आदर्श अधिकारी पूरस्थितीत मंडळ अधिकारी अशोक दराडे व तलाठी राहुल भरणे यांचे उल्लेखनीय कार्य

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा(प्रतिनिधी) :** शासकीय यंत्रणेच्या कार्यक्षमतेचे उत्तम उदाहरण म्हणजे मंडळ अधिकारी अशोक दराडे व तलाठी राहुल भरणे यांचे कार्य होय संकटाच्या काळात जनतेच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत या दोन्ही अधिकाऱ्यांनी दाखवलेली तत्परता, संवेदनशीलता आणि जबाबदार वृत्ती आदर्श ठरली आहे. पूरग्रस्त भागात घराघरात जाऊन परिस्थितीचा आढावा घेणे, नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविणे, अन्न, पाणी व आरोग्य सेवांची सोय करून देणे तसेच शासनाच्या मदतीचा प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत तात्काळ पोहोच होण्यासाठी केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक पातळीवर आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत राहिली. प्रशासन, पोलिस, ग्राम पंचायत व स्वयंसेवक यांच्या संयुक्त समन्वयातून पूरग्रस्त भागात वेळेत मदत पोहोचवून जनतेचा विश्वास



जिंकण्यात ते यशस्वी ठरले. ग्रामस्थांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनीही अशोक दराडे व राहुल भरणे यांच्या प्रामाणिक कार्यनिष्ठा, जनसेवा भाव आणि शासकीय कार्यक्षमतेचे मनापासून कौतुक केले आहे. "अशा अधिकारीवर्गामुळेच शासन खऱ्या अर्थाने जनतेच्या सेवेत कार्यरत आहे." असा प्रतिसाद स्थानिकांनी दिला.

## बुलडाणा अर्बन व जिजाऊ ऑप्टिकल यांचे संयुक्त विद्यमाने अंधारीत मोफत नेत्र तपासणी शिबिर संपन्न



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:-** बुलढाणा अर्बन आर्थिक व्यवहारा सोबत सामाजिक बांधिलकी जोपासणारी संस्था असून संस्थेचे संस्थापक अध्यक् राधेश्यामजी चांडक(भाईजी), बुलढाणा अर्बन चे अध्यक्ष डॉ.श्री सुकेशजी झंवर तसेच बुलढाणा अर्बन चॅरिटेबल अध्यक्षा सौ. कोमलताई झंवर यांच्या कल्पनेतून विभाग सिल्लोड अंतर्गत शाखा अंधारी च्या वतीने शाखा अंधारी च्या 21 व्या वर्धापन दिना निमित्त संस्थेचे सर व्यवस्थापक कैलास कासट , विभागीय व्यवस्थापक संजयजी दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली आज बुलडाणा अर्बन व जिजाऊ ऑप्टिकल यांचे संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिर अंधारी येथे आयोजन केले होते .

अंधारी ता सिल्लोड येथे या मोफत नेत्र तपासणी शिबीर प्रसंगी प्रथम सत्यनारायण पुजा तसेच दिवाळी फराळ आयोजन करण्यात आले होते . सुमारे 200 सभासदांनी मोफत नेत्र तपासणी चा लाभ घेतला याप्रसंगी उपस्थित मान्यवर स्वप्नील सावळे जिजाऊ ऑप्टिकल अंधारी, श्री ज्ञानेश्वर पाटील तायडे माजी सभापती पंचायत समिती सिल्लोड अनिल भाऊ गोरे ग्रामपंचायत सदस्य अंधारी स्थानिक सल्लागार नारायण जाधव, डॉ गणेश पांडव,सुनील मुळे, पुंडलिक तायडे, आप्पाराव सुलताने, नामदेव तायडे , संजय दळवी विभागीय व्यवस्थापक ,सतीश साळवे शाखा व्यवस्थापक ,सुधाकर कादी, विलास ताठे, ईश्वर ठाले, समाधान तायडे ,दीपक मोरे, महेश शिंदे आदीनी परिश्रम घेतले. या यशस्वी नेत्र तपासणी शिबीरा नंतर रुग्णांनी बुलढाणा अर्बन पत संस्थेचे आभार मानले .

## शिराळा ग्रामपंचायतीत मतदार यादीतील बोगस नावे; ग्रामस्थांनी केली चौकशीची मागणी



**दैनिक युवक आधार**
**सेलू (प्रतिनिधी) शिवाजी पवार**

शिराळा ग्रामपंचायत हद्दीतील मतदार यादीत 15 ते 20 बोगस नावांचा समावेश झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून संबंधित नावे वगळण्याची मागणी करण्यात आली आहे.

ग्रामस्थांच्या वतीने दिनांक 16 ऑक्टोबर 2025 रोजी तहसील कार्यालय, सेलू येथे जिल्हाधिकारी, निवडणूक आयोग तसेच संबंधित अधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात बोगस नावे कायम राहिल्यास आगामी निवडणुकीत गैरप्रकार घडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

ग्रामस्थांनी केलेल्या निवेदनात पुढील मागण्या करण्यात आल्या आहेत –

1.बोगस नावांची तात्काळ चौकशी करावी.

2.चौकशीनंतर ती नावे मतदार यादीतून वगळावीत.

3.शुद्ध केलेली मतदार यादी ग्रामस्थांसमोर प्रसिद्ध करावी.

4. संबंधित अधिकाऱ्यांनी गावात येऊन प्रत्यक्ष तपासणी करावी.

ग्रामस्थांनी इशारा दिला आहे की, योग्य वेळी कार्यवाही न झाल्यास भविष्यातील निवडणुकीत गोंधळ झाल्यास प्रशासन जबाबदार राहील.

हे या निवेदनावर उद्धव तात्या खेडेकर, गुलाबराव खेडेकर, महादेव वायगुंडे, बाळासाहेब खेडेकर, शंकर खेडेकर, सोपान खेडेकर, गोविंदराव खेडेकर, कल्याणराव खेडेकर, अशोक खेडेकर, मनीष खेडेकर, सोनाजी खेडेकर आदी ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## दिव्यांग व्यक्तींना ई-रिक्षा वाटपाच्या भव्य कार्यक्रमाचे आज आयोजन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राकेश यादव**

**नागपूर :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेअंतर्गत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नागपूर तर्फे नागपूर जिल्ह्यातील गरजू दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मा.ना. श्री. नितिनजी गडकरी, केंद्रीय मंत्री, रस्ते वाहतूक व महामार्ग, भारत सरकार यांचे अध्यक्षतेखाली, तसेच श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते ई-रिक्षा वाटप कार्यक्रमाचे आयोजन दि. १९ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी २ वाजता, ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय, नागपूर करण्यात आले आहे.कार्यक्रमास मा. ना. श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे, मंत्री, महसुल विभाग, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नागपूर जिल्हा, मा.ना.श्री. अतुल सावे, मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण, महाराष्ट्र राज्य, मा.ना. श्री. संजय शिरसाट, मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, महाराष्ट्र राज्य, मा.ना.श्री. आशिषजी जयस्वाल, राज्यमंत्री, वित्त नियोजन, कृषो, मदत व पुर्नवसन, विधी व न्याय, कामगार, महाराष्ट्र राज्य व मा. खासदार, मा. आमदार यांची उपस्थिती लाभणार आहे.या उपक्रमाअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील एकूण ५५५ गरजू दिव्यांग लाभार्थ्यांना ई-रिक्शा व मोटराईज्ड ट्रायसिकलचे वाटप करण्यात येणार असून हा उपक्रम दिव्यांग बांधवांच्या स्वावलंबनासाठी आणि रोजगारनिर्मितीसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल असेच आहे.तसेच या कार्यक्रमात "घर-घर संविधान" या उपक्रमांतर्गत संविधान प्रास्ताविकेचे वाटप कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत जमिनीचे ७/१२ उतारे वाटप कॉफी टेबल बुक, चॅटबोट आणि ॲडव्हेंचर पार्कचे उद्घाटन करण्यात येणार आहेत.हा कार्यक्रम नागपूर शहरात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्यात येत असून, निवड करण्यात आलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांनी नियोजित वेळेत उपस्थित राहावे, तसेच सर्व नागपूरकर नागरिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून दिव्यांग बांधवांचे मनोबल वाढवावे, असे आवाहन श्री. प्रसाद कुळकर्णी, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग नागपूर व श्रीमती. सुकेशिनी तेलगोटे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, नागपूर यांनी केले आहे.

# सकल भटक्या विमुक्त जमाती चे क्रांती मोर्चा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे**



ऐतिहासिक सकल क्रांती मोर्चा मध्ये ४२ भटक्या जाती जमाती यांनी एक दिवस पोटाला चिमटा देऊन शनिवार वाडा ते पुणे जिल्हाधिकारी कार्यालय पर्यंत या चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या माजी आमदार *ज्येष्ठ साहित्यिक उपराकार व माजी आमदार पद्मश्री लक्ष्मणरावजी माने साहेब यांचे समवेत सर्व भटका समाज महिला मुलाबाळासह विराट मोर्चा काढून जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. या *मध्ये भटक्या विमुक्त जमातींना अनुसूचित जमातीमध्ये प्रवर्ग ब असा स्वतंत्र आरक्षण द्यावे. तसेच *स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये भटक्या विमुक्त यांना स्वतंत्र आरक्षित जागा द्यावेत अशा दोन मागण्या उपराकार लक्ष्मण माने यांनी निवेदन द्वारे शासनाकडे केली

या मोर्चामध्ये सर्व समाज प्रतिनिधी तसेच आयोजक यांनी लोकशाही मार्गाने चांगली भूमिका बजावली. व मोर्चा यशस्वी करून दाखविला.

सर्व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते ख-या अर्थाने समाज जागृती होत आहे. अतिशय सुंदर पद्धतीने कालचा क्रांती मोर्चा यशस्वी झाला असे *वैदू समाजाचे नेते, अखिल महाराष्ट्र वैदू समाज विकास फाउंडेशन चे कार्याध्यक्ष व माजी सरपंच श्री.नारायण शिंदे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली.

या मोर्चासाठी पुणे, अहिल्यानगर नाशिक,सोलापूर , धाराशिव, सातारा सांगली कोल्हापूर अशा महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून नंदीवाले गोंधळी जोशी वडार वैदू कैकाडी, नाथपंथी डवरी गोसावी बहुरुपी, गोंधळी समाज, गोसावी असे अनेक जमाती तील संघटनेचे अध्यक्ष व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. विशेष म्हणजे महिला भगिनी, आणि आपल्या पारंपरिक वेशभूषेत आलेले डोंबारी, गोंधळी, बहुरुपी, वैदू , जोगी, हे सर्वांचे लक्ष वेधून घेत होते, वयोवृद्ध असुनही अनेक जेष्ठ नागरिकांनी सहभाग घेतला होता.

भटक्यांचे नेते श्री.भरत विटकर व श्री. मच्छिंद्र चव्हाण माजी पोलीस उपाधीक्षक यांनी आपल्या भाषणामध्ये म्हणाले की, आता सर्वांना कळून चुकले आहे कोणीतरी येईल आणि आमच्या उपेक्षित वंचित समाजाचे दुखणे समजावून घेईल आम्हा भटक्या विमुक्तांना न्याय मिळवून देईल पण असे होताना दिसत नाही.....

आपला लढा आपणालाच लढावा लागेल म्हणून सर्व सामान्य घटकांनी मिळून एकीची वज्रमूठ बांधून बुध्दीजीवी वर्गाला लढ्याचे नेतृत्व देऊन लढा यशस्वी होत नाही तोपर्यंत लढण्याचा निर्धार निर्धार करूया.

प्रत्येक लढ्यात आपण सर्व वारंवार एकत्र येणार आहोत त्यामुळे निश्चितच आपली ताकद वाढणार आहे पण स्वार्थासाठी कोणी आपली दिशाभूल करत नाही ना ? आपल्या एकीत कोणी दुही निर्माण करत नाही ना ? कोणी चुकीचे निरेटीव्ह निर्माण करत नाही ना? याकडे ही बारकाईने लक्ष द्यावे लागेल

अखिल महाराष्ट्र वैदू समाज विकास फाउंडेशन चे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष श्री. राजू रामा लोखंडे व नगरसेविका सौ. चंदाताई लोखंडे यांनी वैदू समाजातील जास्तीत जास्त महिला पुरुष पारंपरिक व्यवसायाच्या वेशभूषेमध्ये मोठ्या संख्येने आणल्याबद्दल व सर्व जमातीतील समाज माता भगिनी व बांधवांनी मोर्चा यशस्वी केला त्याबद्दल त्यांचे कार्याध्यक्ष श्री नारायण शिंदे यांनी मनापासून आभार मानले. पुढील रणनीती लवकरच जाहीर होईल* व अशीच साथ सर्वांनी द्यावी आणि लढा अविरत सुरू ठेवण्यासाठी आपण सर्व समाज बांधवांनी योगदान देत रहावे असे आव्हान करण्यात आले.

## दहावी उत्तीर्ण खेळाडूंसाठी बीएसएफमध्ये ३९१ पदांसाठी थेट भरती

**दैनिक युवक आधार**

देशाच्या प्रमुख निमलष्करी दलात सेवा करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांसाठी ही एक उत्तम संधी आहे.

सीमा सुरक्षा दलाने (BSF) गट "C" अंतर्गत ३९१ कॉन्स्टेबल (जनरल ड्यूटी) पदांच्या भरतीसाठी अधिकृत अधिसूचना जारी केली आहे. ही भरती तात्पुरत्या आधारावर केली जाईल.

ऑनलाइन अर्ज प्रक्रिया १६ ऑक्टोबर २०२५ पासून सुरू होईल आणि ४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत सुरू राहील. निवड प्रक्रियेत केवळ शैक्षणिक पात्रताच नव्हे तर उमेदवारांच्या क्रीडा कामगिरीचा देखील विचार केला जाईल.

पात्रता

शैक्षणिक पात्रता: उमेदवाराने मान्यताप्राप्त मंडळातून मॅट्रिक्युलेशन (१०वी) किंवा त्याच्या समकक्ष पात्रता उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

क्रीडा पात्रता: अधिकृत अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे गेल्या दोन वर्षांत (जाहिरातीच्या शेवटच्या तारखेपूर्वी) कोणत्याही मान्यताप्राप्त क्रीडा स्पर्धेत भाग घेतलेले किंवा पदक जिंकलेले उमेदवारच अर्ज करू शकतात.

वयोमर्यादा: या भरतीसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे आणि कमाल वयोमर्यादा २३ वर्षे आहे. राखीव प्रवर्गासाठी सरकारी नियमांनुसार वयात सूट दिली जाईल.

किमान वय: १८ वर्षे

कमाल वय: २३ वर्षे

बीएसएफ कॉन्स्टेबल जीडी पगार: हा मासिक पगार असेल



निवड झाल्यानंतर, स्तर ३ अंतर्गत दरमहा ₹२१,७००- ₹६९,१०० पगार असेल. याशिवाय, वेळोवेळी नियमांनुसार केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना इतर भत्ते देखील स्वीकार्य आहेत.

बीएसएफ भरती २०२५ साठी अर्ज कसा करावा: अर्ज प्रक्रिया

पात्र उमेदवार खाली दिलेल्या चरणांचे अनुसरण करून बीएसएफ भरतीसाठी अर्ज करू शकतात:

सर्वप्रथम अधिकृत वेबसाइट rectt.bsf.gov.in वर जा.

"ऑनलाइन अर्ज करा" लिंकवर क्लिक करा (कॉन्स्टेबल जीडी पदांसाठी).

तुमची वैयक्तिक माहिती प्रविष्ट करून नोंदणी करा आणि लॉगिन आयडी तयार करा.

अर्ज योग्यरित्या भरा.

शैक्षणिक प्रमाणपत्रे, क्रीडा कामगिरी प्रमाणपत्रे इत्यादी आवश्यक कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या प्रती अपलोड करा.

शुल्क ऑनलाइन भरा (लागू असल्यास).

अर्ज सबमिट करा आणि भविष्यातील संदर्भासाठी त्याची प्रिंटआउट सुरक्षित ठेवा.

## दिवाळीच्या मंगलमय सुरुवातीला सद्गुरूच्या रूपात धावून आलेले लोणावळ्यातील 57 टक्के दिव्यांग सोफिया हिला सदगुरू सेवा प्रतिष्ठान पुणे यांच्या वतीने घरपोच कमोड व्हीलचेअरची मदत



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे**

दिनांक 17 ऑक्टोबर 2025 रोजी लोणावळा येथील रिक्षाचालक श्री सलीमभाई अख्तर यांनी आपुलकी दिव्यांग फाऊंडेशनचे श्री विजयजी पगडे यांना कमोड व्हीलचेअरची मागणी केली त्यांनी मधु ताराचे दिव्यांग निर्मलाताई चौधरी यांना संपर्क करावा म्हणून सांगितले.निर्मलाताई यांनी मधु तारा प्रमुखांना या बाबत माहिती दिली.मधु तारा प्रमुखांनी लक्ष्य फाऊंडेशनचे श्री रोशनजी मराठे यांना व्हीलचेअर साठी विनंती केली.

आणि रोशनजी मराठे यांनी पुण्यातील दिव्यांगांसाठी कार्य करणाऱ्या सदगुरू सेवा प्रतिष्ठानचे श्री सचिन म्हसे यांना सांगताच.सद्गुरूच्या रूपात येऊन श्री सचिन सर आणि त्यांच्या टीमने क्षणाचाही विलंब न करता एका दिवसात पुण्याहून कमोड व्हीलचेअर घेऊन लोणावळ्यातील दिव्यांग सोफिया सलीम अख्तर यांना त्यांच्या राहत्या घरी नेऊन दिली.

या महान कार्यासाठी मधु तारा प्रमुख श्री नितीनजी शिंदे यांनी सद्गुरू सेवा प्रतिष्ठानचे श्री सचिन म्हसे सर आणि त्यांना सहकार्य करणाऱ्या त्यांच्या सर्व टीमचे मनापासून आभार व्यक्त केले.

तसेच एक मेका करू सहाय्य अवघे धरू सुपंथ म्हणून कार्य करणाऱ्या सदगुरू सेवा प्रतिष्ठान श्री सचिन म्हसे सर यांच्या सह लक्ष्य फाऊंडेशन श्री रोशनजी मराठे सर.आपुलकी दिव्यांग फाऊंडेशन पिंपरी चिंचवड श्री विजयजी पगडे सर आणि मधु ताराच्या 86 टक्के दिव्यांग असलेल्या निर्मलाताई चौधरी यांचे मनापासून आभार मधु तारा प्रमुख तसेच श्री सलीम भाई अख्तर यांनी व त्यांच्या परिवाराने मानले.

## इंदापूर तालुका शिवसेना उबाठा कडून जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी इच्छुक उमेदवाराची यादी जाहीर

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

दिनांक १९/१०/२०२५ रोजी निमसाखर येते शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने बैठक संपन्न झाली ही बैठक आगामी काळात होणाऱ्या पंचायत समिती जिल्हा परिषद इच्छुक उमेदवारांसाठी घेतली होते या बैठकीमध्ये आठ जिल्हा परिषद आणि सोळा पंचायत समिती गणासाठी आपले शिवसैनिक पदाधिकारी इच्छुक असल्याचे दिसून आले काही कारणास्तव ही घेतलेली तातडीची बैठक होती पुढील बैठक २६ ऑक्टोबर २०२५ रोजी ठरवली असून पुढच्या बैठकीसाठी यापेक्षा जास्त उमेदवार इच्छुक राहतील.

या बैठकीसाठी शिवसेना जिल्हाप्रमुख संजय काळे, तालुकाप्रमुख नितीन शिंदे, तालुका समन्वयक अरुण पवार तालुका संघटक सुदर्शन रणवरे उपतालुकाप्रमुख संदीप चौधरी विभाग प्रमुख दत्ता खुडे अभिजित पाटील उपविभाग प्रमुख तुषार दळवी अरविंद आडसुळ व इतर प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते

इच्छुक उमेदवार खालील प्रमाणे

६६. भिगवण- शेटफळगढे गट, सर्वसाधारण महिला

सौ शशिकला पोपट बंडगर, मदनवाडी

१) १३१. भिगवण गण- सर्वसाधारण महिला

सौ सुवर्णा पांडुरंग वाघ तक्रारवाडी

२) १३२. शेटफळगढे गण- सर्वसाधारण

श्री महादेव बाजीराव सकुंडे, मदनवाडी

श्री विशाल सुरेश यादव,

६७. पळसदेव- बिजवडी गट, ओबीसी महिला

१) १३३. पळसदेव गण- सर्वसाधारण महिला




सौ ऋतुजा आप्पासाहेब डोंगरे, लोणी देवकर

२) १३४. बिजवडी गण- ओबीसी

६८. माळवाडी- वडापुरी गट, सर्वसाधारण

श्री सचिन बापूराव इंगळे, हिंगणगाव

१) १३५. माळवाडी गण- सर्वसाधारण महिला

२) १३६. वडापुरी गण- सर्वसाधारण महिला

सौ रेश्मा तात्या पाटील

६९. निमगाव केतकी- शेळगाव गट,सर्वसासाधारण महिला

सौ प्रज्ञा नितीन कदम, शिरसटवाडी

१) १३७. निमगाव केतकी गण- ओबीसी

श्री सोमनाथ आप्पासो शेंडे, निमगाव

श्री रणजीत दादाराव बारवकर निमगाव

२) १३८. शेळगाव गण- सर्वसाधारण

श्री सुदर्शन अनिल रणवरे, निमसाखर

ॲड.श्री नितीन बुवासाहेब कदम शिरसाटवाडी

७०. बोरी- वालचंदनगर गट, अनु.जाती महिला

सौ शिला दत्ता खुडे, लालपुरी

१) १३९. बोरी गण- सर्वसाधारण

श्री नंदकुमार राजेभोसले, कळस

२) १४०. वालचंदनगर गण- अनुसूचित जाती महिला

सौ पूजा सचिन तुपे, कळंब

७१. लासूर्णे-सणसर गट, अनु.जाती महिला

सौ शोभा अरविंद सूर्यवंशी

१) १४१. लासूर्णे गण- अनुसूचित जाती

श्री रमेश संभाजी गायकवाड, बेलवाडी

श्री बाळासाहेब लक्ष्मण मोरे, बेलवाडी

२) १४२. सणसर गण- अनुसूचित जाती महिला

सौ सोनाली तानाजी रंधवे, सणसर

सौ छबाबाई चंद्रकांत जाधव, तावशी

७२. काठी- लाखेवाडी गट, सर्वसाधारण

श्री नितिन ज्ञानदेव शिंदे, शेटफळ हवेली

१) १४३. काठी गण- सर्वसाधारण

श्री दत्ता घोरपडे घोरपडवाडी

२) १४४. लाखेवाडी गण- ओबीसी महिला,

सौ रूपाली संदीप चौधरी, भोडणी

सौ रेश्मा अभिजीत पाटील, रेडणी

७३. बावडा- लुमेवाडी गट, सर्वसाधारण महिला

सौ मनीषा अरुण पवार, वकीलवस्ती

१) १४५. बावडा गण- ओबीसी महिला

२) १४६. लुमेवाडी गण- सर्वसाधारण

श्री अतुल किसनराव घोगरे, नरसिंगपूर

## पंचायत समिती निवडणुकीत बेलवाडीचे सागर भाऊ भिसे रिंगणात उतरणार

### स्थानिक मतदारांमध्ये आनंदाचे वातावरण. !

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

येत्या पंचायतसमिती निवडणुकीसाठी लासुर्णे गणातील परिसरात राजकीय हालचालींना वेग आला असून तरुण नेतृत्व म्हणून सागर भिसे यांचे नाव चर्चेत आले आहे.

सामाजिक बांधिलकी लोकसंपर्क व विकासाभिमुख दृष्टिकोनामुळे स्थानिक नागरिकांचा सागर भिसे यांच्यावर वाढता विश्वास मतदारांमध्ये दिसून येत आहे.काही वर्षांपासून गावातील विविध सामाजिक, शैक्षणिक आणि क्रीडा उपक्रमांमध्ये सक्रिय असून युवकांना एकत्र करून ग्रामविकासाची दिशा दाखवत आहेत गावात रस्तेपाणीपुरवठा शिक्षण आणि आरोग्यविषयक समस्या दूर करण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे युवा उत्साही आणि स्वच्छ प्रतिमेचे युवा नेतृत्व म्हणून सागर भिसे यांना स्थानिक तरुण वर्ग शेतकरी आणि महिला मंडळां कडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

ग्रामविकासासाठी प्रामाणिक प्रयत्न आणि लोकसेवा हीच माझी दिशा असेल असे मत इच्छुक



उमेदवार सागर भाऊ भिसे यांनी व्यक्त केले पंचायत समिती निवडणुकीत सागर भाऊ भिसे यांच्या उमेदवारीमुळे बेलवाडी परिसरातील थोरातवाडी लासुर्णे बंबाडवाडी बजरंगवाडी गावातील मतदारांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.स्थानिक नागरिकांचा कल आणि जनसंपर्क पाहता ही निवडणूक चुरशीची होण्याची चिन्हे दिसत आहेत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# सणसर येथील बौद्ध वस्तीत धम्मस्तंभाचे उदघाटन



**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील सणसर गावातील सिद्धार्थनगर येथे बौध्द समाज बांधव व युवक एकत्र येऊन दीपावलीनिमित्त वस्तीमध्ये धम्मस्तंभ उभारण्यात आला या स्तंभाचे उदघाटन सणसर गावचे कर्तव्यदक्ष युवा सरपंच यशवंत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले तर या स्तंभाची विधीवत पूजाअर्चा व धम्मप्रार्थना राजेंद्र महादेव चव्हाण यांनी केली यावेळी वास्तूविशारद दिपक निंबाळकर सणसर गावचे पोलीस पाटील राजेंद्र चव्हाण माजी ग्रामपंचायत सदस्य शरद कांबळे रामदास चव्हाण आरिफभाई तांबोळी माजी ग्रामपंचायत महिला सदस्या कामिनी चव्हाण शैला चव्हाण शालन जगताप सीताबाई कांबळे विनोद चव्हाण शरद चव्हाण संजय चव्हाण बाळासो खरात सतीश चव्हाण विजय चव्हाण सर बापू जगताप गणेश भोसले अमित चव्हाण अमोल चव्हाण अरविंद चव्हाण आदी युवक कार्यकर्ते व महिला मोठया संख्येने उपस्थित होते.

# बसस्थानक की कचरा डेपो?

## लांब पल्ल्याच्या बस 'ओव्हरटेक', प्रवाशांची गैरसोय चरमसीमेवर!

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर** :-निफाड तालुक्यातील विंचूर येथील एस.टी. बसस्थानकाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. अस्वच्छता, पिण्याच्या पाण्याची कमतरता आणि तुटलेल्या सुविधांमुळे प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच लांब पल्ल्याच्या बस विंचूर स्थानकात थांबत नसल्याने प्रवाशांचा संताप उसळला आहे.

**लांब पल्ल्याच्या बस 'ओव्हरटेक'**

विंचूर हे नाशिक– छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील प्रमुख केंद्र असूनही, पुणे, मुंबई, शिर्डी, छत्रपती संभाजीनगर आदी ठिकाणांच्या बस गाड्या येथे थांबत नाहीत. प्रवाशांना बस पकडण्यासाठी नाशिक किंवा येवला येथे धाव घ्यावी लागते. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा तिहेरी




> विंचूर बसस्थानकात टॉयलेटची बिकट अवस्था आहे. नागरिक बसस्थानकातच दारू पित बसतात. काही बस स्थानकात न थांबता थेट चौफुलीवर थांबतात, त्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास संभाजीनगर–नाशिक महामार्गावर तीव्र आंदोलन केले जाईल," असा इशारा विंचूर ग्रामपालिका सदस्य राजेंद्र मोरे यांनी दिला.

फटका बसतो. विशेषतः वृद्ध आणि महिला प्रवाशांना यातून मोठी गैरसोय सहन करावी लागते.

**अस्वच्छतेचा कळस**

बसस्थानक परिसरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. शौचालयांची अवस्था बिकट असून, दुर्गंधीमुळे त्यांचा वापर करणे अशक्य झाले आहे. पिण्याच्या पाण्याची कोणतीही सोय नाही. नळ कोरडे पडलेले आहेत. प्रतीक्षालयातील आसने तुटलेली असून, रात्री पुरेशा प्रकाशाची सोय नसल्याने प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागतो.

**महामंडळाकडे नागरिकांची मागणी**

स्थानिक नागरिकांनी एस.टी. महामंडळाकडे मागणी केली आहे की,लांब पल्ल्याच्या बसना विंचूर येथे थांबा द्यावा,बसस्थानकाची स्वच्छता, पाण्याची व प्रकाशाची सोय तातडीने सुधारावी,शौचालये व प्रतीक्षालयाची दुरुस्ती करावी.

महामंडळाच्या सातत्याने दुर्लक्षामुळे प्रवाशांची गैरसोय वाढत असून, प्रशासनाने लवकरात लवकर लक्ष न दिल्यास आंदोलनाची ठिणगी पेटण्याची शक्यता आहे.

# तहसीलदाराचा भ्रष्टाचाराचा अंत वरिष्ठ अधिकाऱ्यांना नाही खंत.ते दिवाळीत खातील तुपाशी वृद्ध शेतकरी महिला जिल्हाधिकारी वाशिम च्या बाजूला उपाशी

**भर दिवाळीत वृद्ध शेतकरी महिलेचे न्यायासाठी उपोषण**

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील.**

**वाशिम** :- येथील तहसीलदार निलेश पळसकर यांनी कोणतीही सूचना न देता नोटीस ना पाठविता परस्पर आदेश काढल्याची तक्रार रुखमाबाई जमदाडे यांनी मुख्यमंत्र्याकडे केली आहे. शिवाय आदेश काढण्याकरिता लाखो रुपयाची देवाण-घेवाण केल्याचाही आरोप केला असून कारवाईसाठी वृद्ध महिला रुखमाबाई जमदाडे यांनी आठ दिवसापासून उपोषण सुरू केले आहे. महसूल अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट धोरणामुळे गरीब वृद्ध महिलेला विनाकारण त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे उपोषण करून तिचे मरण होत आहे. अँड दिवाळीत वृद्ध शेतकरी




महिलेने न्यायासाठी उपोषण सुरू केले आहे. निवेदनानुसार उकळी पेन येथील रुखमाबाई जमदाडे यांनी दि.17. डिसेंबर 1995. रोजी नोंदणीकृत खरेदी खता द्वारे तुकाराम नारायण माने यांच्याकडून गट क्रमांक 294. मधील जमीन विकत घेतली त्यानुसार दिनांक 11 एप्रिल 1986 रोजी फेरफार नोंद घेण्यात आली. गट क्रमांक 294.मधील एक हेक्टर 86 आर जमीन होती 15 एप्रिल 1923 रोजी 82 आर जमीन नोंदणीकृत खरेदी खता द्वारे गौतम रामजी इंगोले यांना विकली. उर्वरित शिल्लक 74 आर जमीन माझ्या मालकीची असून माझ्या ताब्यात आहे. मात्र असे असताना रामकिसन राजाराम माने यांनी खोट्या तथ्याच्या आधारे चूक दुरुस्तीचा अर्ज केला मला व गौतम इंगोले ला हजर राहून बाजू मांडण्याकरिता सांगण्यात आले. बाजू लेखी स्वरूपात मांडून सुद्धा 4 मार्च 2025 रोजी प्रकरण बंद करण्यात आले. प्रकरणाबाबत वकिलामार्फत विचारणा केली असता सूचना न करता परस्पर आदेश पारित करण्याची खोटी तारीख नमूद करून तहसीलदाराने खोटा आदेश काढला. त्यामुळे कर्तव्यात कसूर करणाऱ्या तहसीलदार निलेश पळसकर यांची गडचिरोली येथे वरिष्ठांनी बदली करावी. खोटा आदेश रद्द करून 7/12. कायम ठेवावा. अन संबंधितावर कारवाई करण्याची मागणी रुखमाबाई जमदाडे उकळी पेन येथील शेतकरी यांनी केली आहे.

# रेवदंडा–नागावच्या सर्वांगीण विकासासाठी 'बदल' घडवण्याची वेळ आली - अँड रोहित भोईर

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

अलिबाग पंचायत समिती निवडणुकीत नागरिकांच्या अपेक्षांचा केंद्रबिंदू बनले ऍड. रोहित भोईर .रेवदंडा–नागाव परिसर पर्यटनदृष्ट्या ओळखला जात असला, तरी आजही अनेक मूलभूत सुविधा अभावाने दिसतात. स्वच्छ आणि पुरेसे पाणी, रस्त्यांवरील पथदिवे, दर्जेदार आरोग्य सुविधा, तरुणांसाठी क्रीडांगण, व्यायामशाळा आणि अंतर्गत रस्त्यांचे जाळे , ही सर्व स्वप्ने अनेक वर्षे प्रलंबित आहेत. ही स्वप्ने वास्तवात उतरवण्यासाठी आणि विकासाला खऱ्या अर्थाने गती देण्यासाठी अलिबाग पंचायत समितीच्या निवडणुकीत युवक, सुसंस्कृत आणि सुशिक्षित उमेदवार अँड. रोहित भोईर मैदानात उतरले आहेत.

रोहित दादांचे व्यक्तिमत्त्व



जनसामान्यात मिसळणारे, सर्वसामान्यांच्या भावना ओळखणारे आणि स्थानिक पातळीवर कार्यक्षमतेचा ठसा उमटवणारे आहे. त्यांचा विश्वास आहे की "विकास हे फक्त आश्वासन नव्हे, तर कृतीतून दिसणारे वास्तव असले पाहिजे."

रेवदंडा–नागावच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांची स्पष्ट भूमिका आहे "प्रत्येक नागरिकाला मूलभूत हक्क मिळायलाच हवेत. चांगले रस्ते, स्वच्छता, पिण्याचे पाणी, पथदिवे, आरोग्यसेवा आणि क्रीडाविकास हे कोणत्याही गावाचा पाया आहेत. ही कामे मार्गी लावण्यासाठी माझा प्रामाणिक प्रयत्न असेल."या पार्श्वभूमीवर मतदारराजा आता सज्ज झाला आहे. सर्वत्र एकच चर्चा "या वेळी बदल घडणार आणि तो बदल रोहित दादाच घडवणार!"रेवदंडा आणि नागावच्या विकासासाठी प्रत्येक मत महत्वाचे आहे. अनेक वर्षांपासून रखडलेली विकासकामे मार्गी लावायची असतील, पर्यटनाला चालना द्यायची असेल आणि तरुणाईला नवा उभारीचा मार्ग द्यायचा असेल तर आता रोहित दादा शिवाय पर्याय नाही!जनतेच्या हक्काचा, न्यायाचा आणि विकासाचा लढा अँड. रोहित भोईर यांच्या नेतृत्वाखाली!

# गतिमान प्रशासनाचे नवे प्रतिमान: ई–ऑफिस

कधी काळी सरकारी कार्यालयात पाऊल टाकलं की सर्वप्रथम नजरेत भरायचे ते म्हणजे टेबलांवर रचलेले फाईलींचे डोंगर. धूळ, उघडी पानं, आणि त्या सगळयांच्या गर्दीत हरवलेले अर्ज– हे दृश्य भारतीय प्रशासनाची ओळख बनले होते. "फाईल अजून आली नाही", "सही बाकी आहे", "प्रकरण मंत्रालयात आहे" – अशी उत्तरं नागरिकांनी वर्षानुवर्षे ऐकली. शासनाकडे केवळ हक्कासाठी नव्हे, तर आपली फाईल 'अडकू नये' म्हणूनच लोकांना फेऱ्या माराव्या लागत. या सगळयाचं कारण साधं होतं, शासनाची प्रणाली पूर्णपणे कागदांवर चालायची. फाईल हातोहात फिरवली जायची. ती कुठे हरवली, कोणाकडे अडकली हे शोधणं म्हणजे गवताच्या गंजीत सुई शोधण्यासारखं काम होतं. परंतु, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या चाणाक्ष नजरेने ही बाब हेरली आणि 150 दिवसांच्या प्रशासकीय सुधारणांच्या कामात प्रत्येक विभाग आणि कार्यालयाला ई-ऑफिस प्रणालीवर येणे अनिवार्य केले. बघता बघता नंदुरबार सारख्या आदिवासी बहुल जिल्ह्यात एक नाही तर तब्बल 34 कार्यालये आजतागायत ई-ऑफिस प्रणालीवर आली आहेत.

**ई-ऑफिसचा जन्म**

2000 च्या दशकात सरकारने ठरवलं की बदल आवश्यक आहे. देश माहिती तंत्रज्ञानाच्या युगात प्रवेश करत होता. तेव्हा 'ई-गव्हर्नन्स' ही संकल्पना पुढे आली. शासनाच्या प्रत्येक कामकाजात डिजिटल तंत्रज्ञान आणण्याचा प्रयत्न सुरु झाला. राष्ट्रीय माहिती केंद्राने (NIC) या संकल्पनेला प्रत्यक्ष रूप दिलं आणि ई-ऑफिस प्रणाली विकसित केली. कल्पना साधी पण क्रांतिकारक होती-कागदाऐवजी संगणक, हस्ताक्षराऐवजी डिजिटल सही, आणि फाईलऐवजी ऑनलाईन व्यवस्थापन. या प्रणालीत प्रत्येक अर्ज, पत्र किंवा प्रस्ताव डिजिटल स्वरूपात तयार होतो. त्यावर अधिकाऱ्यांची टिपणी, आदेश आणि निर्णय थेट ऑनलाइन नोंदवले जातात. "फाईल कुठे आहे?" हा प्रश्न कायमचा संपतो.

**बदलाची पहिली पाऊले**

सुरुवातीला सर्व काही सोपं नव्हतं. अनेक कर्मचाऱ्यांना संगणकाची सवय नव्हती. की-बोर्डवर टायपिंग करणे अवघड वाटत होते. कागदावर काम करण्याची मानसिकता खोलवर रुजलेली होती. पण जसजसा अनुभव वाढला, तसतसे वातावरण बदलू लागले. पहिल्या काही फाईली वेळेत पूर्ण झाल्या, काही अर्ज अपेक्षेपेक्षा जलद मंजूर झाले. लोकांना जाणवलं की ई-ऑफिस ही केवळ तांत्रिक प्रणाली नाही, तर कामकाजाच्या संस्कृतीतला बदल आहे. कागदावरील अवलंबित्व कमी झालं, खर्च घटला, आणि निर्णय प्रक्रियेला वेग आला. अधिकाऱ्यांना



कामावर अधिक नियंत्रण मिळालं, आणि नागरिकांना वेळेवर प्रतिसाद मिळू लागला.

**नंदुरबारचा डिजिटल प्रवास**

महाराष्ट्रातील नंदुरबार हा आदिवासीबहुल, डोंगराळ आणि दुर्गम जिल्हा. इथल्या नागरिकांसाठी प्रशासनाची दारे नेहमीच थोडी दूर वाटायची. अर्ज दिल्यानंतर तो पुढे गेला का, कुणाकडे गेला, मंजुरी कधी मिळेल हे समजणं अवघड असायचं. पण काही वर्षांपूर्वी जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात ई-ऑफिसची अंमलबजावणी झाली. प्रशिक्षण देण्यात आलं, नेटवर्क सुधारण्यात आलं, आणि प्रत्येक विभागाला या प्रणालीशी जोडण्यात आलं. आज जिल्हाधिकारी कार्यालयात आलेला अर्ज थेट संगणकावर नोंदवला जातो. त्याची स्कॅन प्रत प्रणालीवर अपलोड होते, संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठवली जाते आणि त्याची स्थिती रिअल-टाईममध्ये दिसते. नागरिकाला अर्जाचा क्रमांक मिळतो, ज्याद्वारे तो ऑनलाईन त्याचा मागोवा घेऊ शकतो.

**एका शेतकऱ्याचा अनुभव**


अक्कलकुवा तालुक्यातील रमेश पावरा हे छोटे शेतकरी त्यांना जमिनीच्या नोंदणीसाठी अर्ज करायचा होता. पूर्वी, ते अनेकदा तहसील कार्यालयात गेले, पण प्रत्येक वेळी नवीन कारण मिळायचं "फाईल हरवली आहे", "सही बाकी आहे", "अजून पुढे गेली नाही." यंदा त्यांनी अर्ज दिला आणि तो ई-ऑफिसवर टाकला गेला. दोन दिवसांनी गावातील कॉमन सर्व्हिस सेंटरवरून त्यांनी लॉगिन करून पाहिलं, फाईल तहसीलदारांकडे पोहोचली होती. आणखी काही दिवसांत मंजुरीही मिळाली. त्यांच्या डोळ्यांत समाधान होतं. ते म्हणाले, "पूर्वी माझा अर्ज लालफितीच्या डोंगरात अडकायचा, आता तो बुलेट ट्रेनच्या गतीने पुढे जातो." ही केवळ रमेशची यांची कथा नाही, ती नंदुरबारच्या नव्या गतिमान प्रशासनाची ओळख आहे.

**कामकाजातील बदल**

ई-ऑफिसमुळे महसूल, आरोग्य आणि शिक्षण या तिन्ही प्रमुख विभागांत गती आली आहे. महसूल विभागात नामांतरण, वारसा आणि जमिनीच्या नोंदी आता काही दिवसांत पूर्ण होतात. पूर्वी हेच काम महिनोमहिने अडकायचं. जिल्हा सामान्य रुग्णालयातील औषध खरेदीचे प्रस्ताव, डॉक्टरांच्या नियुक्तीची कागदपत्रं आणि शासकीय पत्रव्यवहार सर्व आता ई-ऑफिसवरूनच प्रक्रिया होतात. मंजुरीसाठी लागणारा वेळ निम्म्यावर आला आहे. शिक्षण विभागात शाळांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव, शिक्षक बदल्यांचे अर्ज, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती सर्वकाही डिजिटल झालं आहे. शाळांना निधी वेळेत मिळतो आणि विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती विलंब न होता मिळते.

**दुर्गम भागातील डिजिटल पहाट**

नंदुरबारचा भूगोल कठीण आहे. धडगाव, शहादा आणि अक्कलकुवा यांसारख्या तालुक्यांतील अनेक पाडे अजूनही डोंगरमाथ्यावर वसलेले आहेत. इथे वीजपुरवठा आणि नेटवर्क या दोन्ही अडचणी कायम आहेत. प्रशासनाने या अडचणींवर उपाय शोधत प्रत्येक कार्यालयाला ई-ऑफिसशी जोडण्याचं काम केलं. अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिलं, तांत्रिक सुविधा निर्माण केल्या आणि कर्मचारीवर्गाला



बदलासाठी तयार केलं. आज डोंगराच्या पायथ्याशी राहणारा शेतकरी आपला अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचताना पाहतो. त्याच्यासाठी हा केवळ तांत्रिक बदल नाही, तर लोकशाहीचा नवा अनुभव आहे.

**पारदर्शकता आणि जबाबदारी**

ई-ऑफिसचं सर्वात मोठं यश म्हणजे पारदर्शकता. फाईल कुठे आहे, कोणाकडे आहे, किती दिवसांपासून आहे, हे सर्व प्रणालीवर स्पष्ट दिसतं. त्यामुळे जबाबदारी ठरते आणि भ्रष्टाचाराला आळा बसतो. पूर्वी फाईल हरवली की दोष ठरवणं कठीण होतं.आता प्रणाली स्वतःच नोंदी ठेवते. यामुळे प्रशासन अधिक जबाबदार आणि नागरिकांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. जिल्हा प्रशासनाने 'कागदविरहित कार्यालय' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. कागदांचा वापर घटला आहे, छपाईचा खर्च कमी झाला आहे आणि पर्यावरणालाही फायदा झाला आहे.

**नागरिकांच्या जीवनातील बदल**

ई-ऑफिसचा परिणाम केवळ कार्यालयांपुरता मर्यादित राहिला नाही, तो थेट नागरिकांच्या जीवनात दिसतो. पेन्शनधारक वृद्धांना त्यांचा अर्ज वेळेत मंजूर होतो. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळेवर मिळते. शेतकऱ्यांना पिकविम्याचे पैसे योग्य वेळी मिळतात. "फाईल हरवली" हे वाक्य आता इतिहास झाले आहे. लोक हसून म्हणतात, "फाईल पुढे गेली आहे." हा बदल शांत आहे, पण प्रभावी आहे.

**आव्हाने आणि शिकलेले धडे**

ई-ऑफिसचा प्रवास सहज नव्हता. काही कर्मचाऱ्यांना नव्या प्रणालीबद्दल भीती वाटली. तांत्रिक त्रुटी आल्या, इंटरनेट मंद होतं, काही ठिकाणी वीज पुरवठा खंडित होत असे. पण, प्रशासनाने सातत्य आणि संयम ठेवला. कर्मचाऱ्यांना वारंवार प्रशिक्षण दिलं, अडचणी समजून घेतल्या आणि त्यावर एकत्रित उपाय शोधले. काही वर्षांतच सर्व कार्यालयांनी या प्रणालीला स्वीकारलं. या अनुभवाने दाखवून दिलं की इच्छाशक्ती असेल, तर कोणताही बदल शक्य आहे. आणि जेव्हा त्या बदलाच्या मागे नागरिकांचा विश्वास असतो, तेव्हा तो टिकून राहतो.

**नव्या युगाची सुरुवात**

ई-ऑफिस ही फक्त प्रणाली नाही, ती शासन आणि नागरिक यांच्यातील दुवा आहे.ती वेळ वाचवते, खर्च कमी करते आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे विश्वास निर्माण करते. नंदुरबार जिल्ह्याने हा प्रयोग यशस्वीपणे राबवला आहे. आज प्रत्येक विभागात कामकाज गतीमान झालं आहे. अधिकाऱ्यांना निर्णय घेण्यासाठी आवश्यक माहिती सहज उपलब्ध होते. नागरिकांनाही आपल्या प्रकरणाची स्थिती जाणून घेणं सोपं झालं आहे. प्रशासन आता केवळ फाईलींचं नाही, तर लोकांच्या अपेक्षांचं प्रशासन बनलं आहे.

**ई-ऑफिसचा पुढचा अध्याय**

ई-ऑफिसचा प्रवास फक्त नंदुरबारपुरता नाही. तो त्या महाराष्ट्राचा आरसा आहे जो हळूहळू कागदांवरून स्क्रीनवर जात आहे. राज्य सरकारने "पेपरलेस सचिवालय" हे ध्येय ठेवलं आहे, आणि जिल्ह्यांची कामगिरी त्या दिशेने आशादायक आहे. पुढील काही वर्षांत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा विश्लेषण यांचा वापर ई-ऑफिसमध्ये वाढेल. फाईल फक्त डिजिटल न राहता स्मार्ट बनेल ती स्वतः पुढचा टप्पा ओळखेल, निर्णयप्रक्रियेत मदत करेल, आणि विलंब झाल्यास स्वयंचलित सूचना देईल. नंदुरबारसारख्या जिल्ह्यांनी या बदलाचं नेतृत्व केलं तर ग्रामीण भारताचं प्रशासनही डिजिटल युगात उभं राहील.

**नवी कार्यसंस्कृती**

ई-ऑफिस ही केवळ सॉफ्टवेअर प्रणाली नाही, तर एक नवी कार्यसंस्कृती आहे जबाबदारी, पारदर्शकता आणि वेळेच्या मूल्याची संस्कृती. या प्रणालीने प्रशासनातील मानवी संवेदनांना नवी उंची दिली आहे. जेव्हा एखाद्या वृद्धाला पेन्शन वेळेत मिळते, तेव्हा ती फक्त फाईल पूर्ण झाल्याची नोंद नसते, तर त्याच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान प्रशासनाच्या मानवतेचं प्रतीक असतं.

ई-ऑफिस प्रणालीचा प्रवास म्हणजे कागदांच्या ढिगाऱ्यांमधून डिजिटल प्रकाशाकडे नेणारी वाट. तो प्रवास फक्त तांत्रिक बदलांचा नाही, तर लोकशाहीला नवा श्वास देणारा आहे. नंदुरबारचा अनुभव सांगतो की तंत्रज्ञान हे कुणाची मक्तेदारी नाही; ते डोंगर, पाडे आणि शेतीमध्येही तितक्याच ताकदीने रुजू शकतं.

आज "फाईल हरवली" हे वाक्य इतिहास आहे, आणि "फाईल एका क्लिकवर" ही वास्तवाची नवी ओळख. कदाचित काही वर्षांनी आपण मागे वळून पाहू तेव्हा लक्षात येईल की, ई-ऑफिस ही केवळ संगणक प्रणाली नव्हती तर ती भारताच्या लोकशाहीच्या नव्या अध्यायाचं पहिलं पान होती.

**रणजितसिंह राजपूत,**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**नंदुरबार**

## शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे माता भगिनींसाठी भाऊबीजनिमित्त दिवाळी फराळासह मिठाई व साड्यांचे वाटप



**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या खांदा वसाहत शहर शाखेतर्फे गेली सात वर्षे सातत्याने महिलांना भाऊबीज साठी साडीवाटप व बाकीच्यांना मिठाईवाटप करण्यात येते. यंदाही मोठ्या प्रमाणात माता-भगिनींना वाटप करण्यात आले आहे.

खांदा वसाहत शिवसेना शहर प्रमुख सदानंद शिर्के यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम राबविला आज आला असून, यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून उपमहानगरप्रमुख रामदास गोंधळी, उपशहर प्रमुख दत्तात्रय मामुलकर, विभाग प्रमुख दौलत होटकर, कार्यालय प्रमुख संदीप तोरणे, उपकार्यालयाप्रमुख नागम, महिला शहर संघटिका सानिका मोरे, संपर्क संघटिका अर्चना क्षिरसागर, युवासेना सुशांत सावंत, अभेश ओंबळे, सिद्धेश मोकल व सर्व शाखाप्रमुख उपशाखाप्रमुख गटप्रमुख व इतर सर्व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

## सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश गवई यांच्या वर बुट फेकणाऱ्या देशद्रोही चा जाहीर निषेध

**दैनिक युवक आधार**

**पुणे प्रतिनिधी** : सुप्रिम कोर्टाचे भारताचे सरन्यायाधिश मा.भूषण गवई साहेब यांच्यावर"बुट फेक" करणाऱ्या देशद्रोही राकेश किशोर याचा जाहिर निषेध करण्यात आला मा. वरिष्ठ पोलीस निरिक्षक साहेब, कोंढवा पोलीस स्टेशन, यांना निवेदन देण्यात आले.अखिल कोंढवा संविधान समर्थन नागरी संघ, कोंढवा (खुर्द), पुणे ४८ च्या वतीने विनंतीपूर्वक निवेदन करतोत की, भारताचे सरन्यायाधिश मा. भूषण गवई साहेब यांचेवर सुप्रिम कोर्टाचे कामकाज चालू असताना राकेश किशोर ह्या इसमाने अनधिकृतपणे कोटोत प्रवेश करून बुट फेकण्याचा प्रयत्न केला. सदरच्या घटनेमुळे सर्व भारतीयांच्या भावना दुखावल्या गेलेल्या आहेत. या निंदनीय प्रकारामुळे भारताच्या सरन्यायाधिश पदाचा भारतीय संविधानाचा व भारतीय लोकशाहीचा अवमान झाला आहे. सदरचे कृत्य हे



देशद्रोही असल्याने महाराष्ट्र सरकारने व केंद्रसरकारने या गंभिर घटनेमध्ये लक्ष घालून मनुवादी, सडक्या बुद्धीच्या राकेश किशोर हया व्यक्तीवर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी अशी विनंती करण्यात आली.यावेळी उपस्थित भीमरत्न विचार मंच (शिवनेरी नगर अशोक सोनवणे .भीमशक्ती संघर्ष समिती (कोंढवा) सज्जन कवडे. भीमशक्ती तरुण मंडळ (भीमनगर) अजय थोरात .संघर्ष मित्र मंडळ (कृष्णा नगर)बाळासाहेब हजारे. सम्राट अशोक मित्र मंडळ (कमेला) विशाल गायकवाड.धम्मदीप एकता संघ (भाग्योदय नगर) दिलीप कांबळे.आदर्श सोशल ग्रुप (कमेला) संतोष गायकवाड.संविधान ग्रुप (वानवडी) ॲड. राम सोनकांबळे. भीमराज प्रतिष्ठाण (येवलेवाडी) संजय अरवडे.नवनीत मित्र मंडळ (समता नगर) उत्तरेश्वर शिंदे.बलभीम मित्र मंडळ (वानवडी बाजार) अजय कांबळे.मिलिंद तरुण मंडळ कोंढवा (बु ॥)अनिकेत जगताप.सावित्री रमाई महिला मंडळ (शिवनेरी नगर) अनुराधा भोसले.भारतीय दलित पँथर महिला आघाडी (कोंढवा) कलावती झाकडे. पंचशील हाईटस् । शिवनेरी नगर) सुनील बनसोडे. महाकाल ग्रुप (समता नगर) लुईस दास.राष्ट्रसेवाभावी मित्र मंडळ(भीमनगर)राजूथोरात. सावित्रीबाई फुले महिला मंडळ (कोंढवा) सुशीला भोसले. अखिल भीमनगर महिला मंडळ (कोंढवा) सुशीला भराने. भीमरत्न रमाई महिला मंडळ (शिवनेरी नगर) तसेच पत्रकार उषा सोनवणे आदी उपस्थित होते.

## ॲंब्युलन्समध्ये लज्जास्पद प्रकार! आशा वर्करला चालकाचा अश्लील प्रस्ताव — गुन्हा दाखल

### महिलेचा मानसिक धक्का; महिला सुरक्षेवर पुन्हा प्रश्नचिन्ह उभे

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर :** नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालयातून परतत असलेल्या आशा वर्कर महिलेला रुग्णवाहिका चालकाने रुग्णवाहिका थांबवून अश्लील प्रस्ताव दिला.

या प्रकरणी संबंधित आशा वर्करने निफाड पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून, चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला (वय ३५, रा. कानळद, ता. निफाड) या आशा सेविका. १८ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री सुमारे ९ वाजेच्या सुमारास १०२ रुग्णवाहिकेने नाशिक येथील जिल्हा शासकीय रुग्णालयातून विंचुरकडे जात होत्या.

शिवरे फाट्याच्या पुढे आल्यानंतर रुग्णवाहिका चालक भाऊसाहेब गुडघे (रा. निमगाव वाकडा, ता. निफाड) याने गाडी थांबवली.

त्यानंतर त्याने फिर्यादीच्या गळयात हात घालत तिच्या छातीस हात लावून “माझ्यासोबत शारीरिक संबंध ठेवशील का?” असा अश्लील प्रस्ताव मांडला.

या प्रकारामुळे फिर्यादी महिलेला मानसिक त्रास झाला असून तिने तत्काळ पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली. निफाड पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा क्रमांक ३३६/२०२५ भा.दं. सं. (बीएनएस) कलम ७४, ७५(१)(ii) अंतर्गत दाखल केला आहे.

या घटनेचा तपास पोलिस निरीक्षक गणेश गुरव व पोलीस उपनिरीक्षक निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार ढिकले करत आहेत.

या प्रकरणामुळे महिला सुरक्षेच्या दृष्टीने पुन्हा एकदा १०२ ॲंब्युलन्स सेवांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.



## बँका आणि खाजगी फायनान्स कंपनीकडून होणारी कर्ज वसुली तात्काळ थांबवावी मनसेची मागणी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत)**

दिंडोरी तालुक्यात परतीच्या पावसाने पुन्हा एकदा जोरदार हजेरी लावली असून, शेतकऱ्यांच्या जिरायती तसेच बागायती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सततच्या आणि अवेळी पडणाऱ्या पावसामुळे द्राक्षबागांमध्ये फळगळ झाली असून, भाजीपाला पिकांवरही गंभीर परिणाम झाला आहे.

जिरायती शेतीतील भात, उडीद, वरई या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. उन्हाळयातील लागवडीसाठी तयार करण्यात आलेल्या कांदा रोपांचे तसेच वेली पिकांचेही नुकसान झाले आहे. या अनियमित हवामानामुळे शेतकऱ्यांची मेहनत आणि



खर्च दोन्ही वाया गेले असून, अनेक ठिकाणी शेतमाल सडून जाण्याची भीती निर्माण झाली आहे.सातत्याने उद्भवणाऱ्या नैसर्गिक संकटामुळे शेतकऱ्यांनी शेतीकामांसाठी घेतलेले ट्रॅक्टर, मालवाहू वाहने, आदींसाठी खासगी फायनान्स कंपन्यांकडून कर्ज घेतले आहे. मात्र पिकांचे आणि उत्पादनांचे अतोनात नुकसान झाल्यामुळे शेतकरी हप्ते भरू शकत नाहीत, त्यामुळे अनेक शेतकरी ‘अपात्र’ ठरवले जात आहेत.

तरीदेखील काही बँका आणि खासगी फायनान्स कंपन्या शेतकऱ्यांकडून कर्जवसुलीसाठी वारंवार नोटिसा पाठवत असून, काही ठिकाणी वसुली एजंट शेतकऱ्यांच्या घरी जाऊन धमक्या देत आहेत. या अमानुष वर्तनामुळे शेतकरी मानसिकदृष्ट्या खचले आहेत आणि आत्महत्येच्या विचारांपर्यंत पोहोचत आहेत.

या गंभीर परिस्थितीकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन बँका आणि खासगी फायनान्सकडून होणारी वसुली तात्पुरती थांबवावी, शेतकऱ्यांना तातडीची मदत व कर्जमाफी जाहीर करावी, अशी तीव्र मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दिंडोरी तालुकाप्रमुख नामदेव देवराम गावित यांनी केली आहे.

## फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण : आनंदीक्षणातून निसर्गविनाश - डॉ. राजेंद्र बगाटे

भारतीय समाज हा सण-उत्सवप्रिय समाज म्हणून जगात ओळखला जातो. आपल्या संस्कृतीतील प्रत्येक सण हा आनंद, ऐक्य, परंपरा आणि श्रद्धेचे प्रतीक असतो. पण आधुनिक काळात या सणांच्या साजरीकरणात अनेक नव्या प्रथा समाविष्ट झाल्या आहेत, ज्यामुळे निसर्गाच्या आरोग्यावर आणि मानवी जीवनावर गंभीर परिणाम होत आहेत. त्यातीलच एक म्हणजे फटाक्यांचा अतिरेकी वापर, ज्यामुळे निर्माण होणारे ध्वनी आणि वायू प्रदूषण आज आपल्या समाजासाठी चिंतेचा विषय बनला आहे. दिवाळी, नाताळ, नवीन वर्ष, लग्नसोहळे, क्रिकेटमधील विजय किंवा राजकीय कार्यक्रम अशाप्रकारचा कोणताही प्रसंग असो, फटाक्यांच्या आवाजाशिवाय तो अपूर्ण वाटतो. परंतु या काही क्षणांच्या आनंदामागे दडलेले प्रदूषणाचे सत्य आपण वारंवार विसरतो.



फटाक्यांचे उत्पादन हे रासायनिक पदार्थांच्या जटिल मिश्रणावर आधारित असते. पोटॅशियम नायट्रेट, सल्फर, कोळशाची भुकटी, बॅरियम, मॅग्नेशियम, लीड, आर्सेनिक, ॲल्युमिनियम, स्ट्रॉन्शियम यांसारख्या अनेक धातू आणि रासायनिक घटकांचा वापर त्यात केला जातो. हे पदार्थ जळताना हवेमध्ये नायट्रोजन ऑक्साइड, सल्फर डायऑक्साइड, कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनोऑक्साइड आणि सूक्ष्म धूलिकण सोडतात. या प्रदूषक वायूंमुळे वातावरणातील हवा विषारी बनते. विशेषतः PM२.५ आणि PM१० या सूक्ष्मकणांचे प्रमाण फटाक्यांच्या दहनावेळी अनेक पट वाढते. (PM२.५ म्हणजे अतिशय बारीक, आणि PM१० म्हणजे थोडे मोठे कण) हे सूक्ष्मकण इतके लहान असतात की ते थेट फुफ्फुसांमध्ये जाऊन रक्तप्रवाहात मिसळतात, ज्यामुळे श्वसनाचे आजार, दमा, ब्रॉन्कायटिस, फुफ्फुसाचे संक्रमण आणि हृदयविकारांची जोखीम वाढते.

प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार, भारतातील प्रमुख शहरांमध्ये दिवाळीनंतर हवेमधील प्रदूषणाची पातळी नेहमीपेक्षा चार ते पाच पट वाढते. दिल्ली, मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये दिवाळीच्या रात्रीनंतर PM२.५ च्या प्रमाणात अत्यंत झपाट्याने वाढ होते. दिल्लीमध्ये तर AQI (Air Quality Index) “गंभीर” या श्रेणीत म्हणजे ४००-५०० पर्यंत पोहोचतो. ही परिस्थिती श्वसनास त्रास देणारी आणि जीवघेणी ठरू शकते. हवेमध्ये सल्फर डायऑक्साइड व नायट्रोजन ऑक्साइडचे प्रमाण वाढल्यामुळे डोळ्यांत जळजळ, घसा खवखवणे, डोकेदुखी, थकवा आणि श्वास घेण्यास त्रास अशी लक्षणे सामान्यपणे दिसून येतात. फटाक्यांच्या दहनामुळे केवळ वायू प्रदूषणच नाही, तर ध्वनी प्रदूषणही प्रचंड प्रमाणात वाढते. साधारण मानवी कानाला सुरक्षित ध्वनीमर्यादा ७५ डेसिबेल इतकी असते, परंतु फटाक्यांच्या स्फोटावेळी आवाजाची तीव्रता १२० ते १५० डेसिबेलपर्यंत पोहोचते. अशा तीव्र आवाजामुळे कानातील श्रवणशक्तीवर परिणाम होतो, झोपेच्या गुणवत्तेत घट येते, रक्तदाब वाढतो आणि मानसिक ताण निर्माण होतो. वृद्ध व्यक्ती, लहान मुले आणि रुग्ण यांच्यासाठी हा आवाज विशेषतः त्रासदायक असतो. पक्षी, प्राणी यांनाही ध्वनी प्रदूषणाचा मोठा फटका बसतो. अनेक पक्षी दिशाभूल होऊन झाडांवरून पडतात, पाळीव प्राण्यांमध्ये भीती आणि अस्वस्थता निर्माण होते, तर वन्यजीवांमध्ये प्रजननाच्या प्रक्रियेवर परिणाम होतो.फटाक्यांचा परिणाम फक्त हवेमध्येच मर्यादित राहत नाही. त्यांचे अवशेष म्हणजे कागदाचे तुकडे, धातूंचे कण, प्लास्टिकचे कवच आणि राख जमिनीवर साचतात. हे सर्व



नाल्यांत, पाण्याच्या स्रोतांत आणि शेतीच्या जमिनीत मिसळून जमिनीचे आणि जलस्रोतांचे प्रदूषण निर्माण करतात. जड धातूंचे हे अवशेष जमिनीतील पोषक घटकांची हानी करतात, त्यामुळे पीक उत्पादनावरही परिणाम होतो. नद्या आणि तलावांमध्ये मिसळलेले हे रसायन जलीय जीवसृष्टीसाठी घातक ठरते. फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण हा केवळ पर्यावरणाचा प्रश्न नाही, तर तो सामाजिक आणि आर्थिक प्रश्नही आहे. दरवर्षी फटाके फोडताना शेकडो अपघात होतात. मुलांच्या आणि तरुणांच्या हातांना, चेहऱ्यांना व डोळ्यांना गंभीर दुखापती होतात. अनेकांना आयुष्यभरासाठी अपंगत्व येते. या दुर्घटनांमुळे रुग्णालयांवरील भार वाढतो आणि कुटुंबांवर मानसिक तसेच आर्थिक ओझे येते. प्रदूषणामुळे वाढणाऱ्या आजारांमुळे आरोग्यखर्च वाढतो, कामकाजातील उत्पादकता कमी होते आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवरही त्याचा नकारात्मक परिणाम होतो.

भारतामध्ये ‘वायू प्रदूषण प्रतिबंधक कायदा, १९८१’, ‘पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६’ आणि ‘ध्वनी प्रदूषण नियंत्रण नियम, २०००’ यांद्वारे फटाक्यांच्या वापरावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न केले गेले आहेत. सर्वोच्च न्यायालयानेही दिवाळीच्या काळात केवळ “ग्रीन फटाके” वापरण्याची शिफारस केली आहे. हे ग्रीन फटाके पारंपरिक फटाक्यांपेक्षा सुमारे ३० टक्के कमी प्रदूषण निर्माण करतात. तसेच रात्री १० नंतर फटाके फोडण्यास बंदी घालण्यात आली आहे. तथापि, या नियमांचे पालन नागरिकांनी मनापासून केले नाही, तर कायदे कागदावरच राहतील.

यावर उपाय म्हणून जनजागृती आणि जबाबदार वर्तन अत्यंत आवश्यक आहे. सण साजरे करणे हे आपल्या संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे, पण सण साजरा करताना निसर्गाचा अपमान न करता, पर्यावरणपूरक पद्धती अवलंबणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. आपण सणाचा आनंद फटाक्यांशिवायही साजरा करू शकतो. पारंपरिक दिवे, एलईडी लाइट्स, संगीत, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम आणि पर्यावरण रक्षणाचे संकल्प यांद्वारे. शाळा-कॉलेजांतून विद्यार्थ्यांना फटाक्यांच्या दुष्परिणामांबद्दल शिक्षित केले पाहिजे. माध्यमांनीही याबाबत जबाबदार भूमिका घेत जनतेला जागरूक करणे आवश्यक आहे. आजचा काळ हा हवामान बदलाचा आणि पर्यावरणीय संकटांचा काळ आहे. पृथ्वीचे तापमान वाढत आहे, पर्जन्यमानात अनिश्चितता वाढली आहे, आणि शुद्ध हवा हे आता लक्झरीसारखे झाले आहे. अशा वेळी काही क्षणांचा आनंद मिळवण्यासाठी आपण आपल्या भविष्याच्या श्वासावर संकट आणू शकत नाही. प्रत्येक नागरिकाने प्रदूषणमुक्त सण साजरा करण्याचा संकल्प केल्यास ही समस्या निश्चितच कमी होईल.

फटाक्यांचा आवाज काही क्षणासाठी आकाश उजळवतो, पण त्याच धुराने आपल्या जीवनाचा प्रकाश मंदावतो. निसर्गाचा आवाज ऐका तो आपल्याला सांगतो की “आनंद करा, पण जबाबदारीने.” सण साजरा करा, पण प्रदूषण नको. प्रकाश पसरवा, पण निसर्गाच्या श्वासाच्या किंमतीवर नाही. खरी दिवाळी, खरा आनंद, खरा प्रकाश तोच जो निसर्ग, समाज आणि मानव यांच्या समन्वयातून जन्मतो. चला, या सणासुदीला आपण सर्वांनी मिळून ठरवूया की “फटाके नाही, फुलझड्यांऐवजी फुलांची सजावट, धूर नाही तर स्वच्छ हवा, आवाज नाही तर आनंदाचा गजर.” कारण सणाचा खरा अर्थ आहे प्रकाशाचा उत्सव आणि तो प्रकाश पर्यावरणपूरक, स्वच्छ आणि शाश्वत असेल, तेव्हाच तो खऱ्या अर्थाने उज्ज्वल ठरेल.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

# प्रकाश चित्ते यांचा शिवसेना,शिंदे गटात प्रवेश

**दैनिक युवक आधार**
**लोणी /प्रतिनिधी**



श्रीरामपूरच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठा भूकंप घडण्याचे चिन्ह स्पष्ट दिसत आहे भाजपचे वरिष्ठ आणि प्रभावशाली नेते प्रकाश चित्ते यांनी पक्षाला राम राम ठोकत आज शिवसेना ( एकनाथ शिंदे गट) मध्ये अधिकृत प्रवेश केला आहे मुंबई येथे राज्याचे मुख्यमंत्री व शिवसेना नेते,एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा भव्य प्रवेश सोहळा आज दुपारी होणार असल्याची पुष्टी सूत्रांकडून मिळाली आहे श्रीरामपूर तालुक्यात प्रकाश चित्ते यांचा मोठा जनाधार असून त्यांच्या या निर्णयामुळे स्थानिक राजकारणात नव्या समीकरणाची निर्मिती होण्याची दाट शक्यता आहे यावेळी तालुका संपर्कप्रमुख जनार्दन लाल पगार सुनील मुथा संजय पांडे राजेंद्र कांबळे माजी नगरसेवक किरण लोनिया आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे चित्ते यांच्या प्रवेशामुळे शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण आहे यापूर्वी माजी आमदार भानुदास मुरकुटे, भाऊसाहेब कांबळे आणि सागर बेग, यांनी शिंदे गटात प्रवेश केला होता आता प्रकाश चित्ते यांच्या प्रवेशामुळे शिवसेना ची (शिंदे,गटा, )ची ताकद आणखी मजबूत होणार आहे विशेष म्हणजे या नव्या प्रवेशामुळे आगामी विधानपरिषद निवडणुकीत चार उमेदवारांमधील मत विभागणी वाढण्याची शक्यता असून त्यामुळे काँग्रेसला थेट फायदा होणार नाही असे राजकीय अभ्यासक बोलत आहे श्रीरामपूर आणि परिसरात गेल्या काही महिन्यापासून शिंदे गटात सातत्याने होत असलेल्या पक्षप्रवेशामुळे या गटाचा जनाधार झपाट्याने वाढताना दिसत आहे भानुदास मुरकुटे, सागर बेग, भाऊसाहेब कांबळे, आणि आत्ता प्रकाश चित्ते यांच्या रूपाने शिंदे गटाने श्रीरामपूरच्या राजकारणात आपले अस्तित्व ठळकपणे अधोरेखित केले आहे आत्तापर्यंत विधानसभा निवडणुकीत दोन नंबरवर,असलेला शिवसेना,(शिंदेगट )पक्ष आता पहिल्या क्रमांकावर झेपावल्याचे स्पष्ट दिसत आहे श्रीरामपूर आगामी निवडणुकीत अत्यंत रंगतदार होण्याची स्पष्ट चिन्ह दिसत आहे

# मधुबन गोशाळा गुंडाळवाडी येथे नवकुंडीय गोसंवर्धन गायत्री महायज्ञ

## वसुबारस आणि गोमाता डोहाळे जेवण संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :डॉ देवेंद्र ओव्हाळ**

घोटवडी गावचे राष्ट्रपती पुरस्कृत आदर्श सरपंच आदरणीय सुनिल शेठ धंद्रे यांच्या मधुबन गोशाळा गुंडाळवाडी (वाडा) येथे शुक्रवार दिनांक १७/१०/२०२५ रोजी सालाबादप्रमाणे याही वर्षी वसुबारस कार्यक्रम मोठ्या थाटामाटात बहुसंख्येने साजरा करण्यात आला.शर्वरी आणि मिना या गायींचे डोहाळे कार्यक्रम संपन्न करण्यात आला. ३० ते ४० गायींना प्रत्येकांनी बाजरींची भाकरी आणि गुळ घालून त्यांना भरवण्यात आले.आणि सर्व गायींना साड्या- पीस त्यांच्या अंगावर झुली प्रमाणे सजावट करून त्यांना आनंद उत्साह करण्यात आला.कार्यक्रमाला खेड तालुक्यातील अनेक मान्यवर तसेच बहुसंख्येने महिला ताई पण उपस्थित होत्या.खेड तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्य अनिल बाबा राक्षे,तसेच जिल्हा परिषद सदस्या डॉ.रोहिणीताई अनिल बाबा राक्षे, सुश्रुत हॉस्पिटल सर्वेसर्वा



डॉ.दिलीप बांबळे सर डॉ.प्रमिला ताई बांबळे मॅडम, डॉ.मंगेश घुमटकर, राजाभाऊ खांडगे, घोटवडी गावचे सरपंच विष्णू शेठ दळवी,ग्रामपंचायत सदस्य राजू आढळ,पोलिस पाटील रंजनाताई धंद्रे/ बरडे,तसेच येणवे खुर्द गावच्या पोलीस पाटील सौ.प्रियांकाताई संदिप भालेराव, (पोलीस पाटील)भाऊसाहेब राऊत विद्यालय घोटवडी विद्यालयातचे माजी मुख्याध्यापक धंद्रे सर,मुख्याध्यापिका सौ. धंद्रे मॅडम,सामाजिक कार्यकर्ते नामदेव वाघचौरे, सुनिल कदम, (उद्योजक )महाराष्ट्र राज्य पत्रकार जनसंवाद न्यूज चॅनलचे संस्थापक सुनिल भाऊ वाघचौरे, पत्रकार डॉ.देवेन्द्रजी ओव्हाळ साहेब,सामाजिक कार्यकर्ते मारुती धादवड,अजय कचरे,खेड तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती चे सचिव बाळासाहेब धंद्रे, पी.एस.आय.- श्री.कांताराम धंद्रे, उद्योजक यशवंतशेठ धंद्रे,तसेच सचिव- सचिन चांभारे,सचिन धंद्रे,मार्केट यार्ड खेड, अनामफ आनंद धंद्रे,शांताराम आढळ, कान्हू आढळ, खेड तालुक्यातील अनेक मान्यवरांनी परिवारा सोबत उपस्थिती दर्शवली. गुंडाळवाडीचे पोलीस पाटील आणि सरपंच तसेच गुंडाळवाडीचे सर्व ग्रामस्त आणि सर्व सामाजिक कार्यकर्ते यांनी या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवली.खेड तालुक्यातील सामाजिक,धार्मिक, शैक्षणिक राजकीय सगळ्याच क्षेत्रातील मंडळींनी उपस्थिती दाखवली.आणि सगळयांच्या हातांनी सर्व गायींची पूजा करून त्यांना ओवाळण्यात आले. त्यांना महाप्रसाद चारण्यात आला. नंतर सत्य नारायणाची आरती करण्यात आली. महाप्रसाद वाटप करण्यात आला. लहान मुलांचे दांडपट्याचा खेळ घेण्यात आला.आणि नंतर कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला.आणि नंतर शेवटी कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# संकटात मदतीचा हात; किराणासह इतर साहित्याचीही मदत, मराठा प्रतिष्ठानच्या पुढाकारामुळे घोसला वासियाना दिलासा

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**



**सोयगाव :** तालुक्यातील घोसला येथे मागील महिन्यात अनेक अतिवृष्टीमुळे भागात पूरपरिस्थिती निर्माण होऊन मोठा फटका बसला.यात शेतीचे नुकसान झाले, पुरात अनेकांचे संसार वाहून गेले. या पार्श्वभूमीवर पूरग्रस्त तसेच गरजू कुटुंबांनाही दिवाळी हा आनंदाचा सण साजरा करता यावा, यासाठी मराठा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपान गव्हांडे व कार्यकर्त्यांनी माणुसकीची साद दिली आहे.रविवारी रात्री आठ वाजता मराठा प्रतिष्ठानच्या वतीने पूरबाचित व गरीब कुटुंबांना दिवाळीनिमित्त जीवनावश्यक किराणा साहित्याच्या किटचे वाटप केले. तेल, साखर, डाळी, फराळाचे साहित्य आणि इतर गरजेच्या वस्तू असलेल्या या किटमुळे घोसला गावांतील कुटुंबांना मोठा आधार मिळाला आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे अडचणीत आलेल्या आणि आर्थिक परिस्थितीमुळे सण साजरा करू न शकणाऱ्या नागरिकांसाठी सामाजिक बांधिलकी जपत चालवलेला हा उपक्रम कौतुकास्पद ठरत आहे. यामुळे त्यांची यंदाची दिवाळी उत्साहाने व समाधानाने साजरी होणार आहे.

घोसला गावात ५२९ कुटुंबांना किराणा किट घोसला येथे मराठा प्रतिष्ठानच्या वतीने गोरगरीब गरजू ५२९ कुटुंबांना डोअर टू डोअर किराणा किट वाटप करण्यात आले. याप्रसंगी मराठा प्रतिष्ठान चे अध्यक्ष सोपान गव्हांडे, जिल्हाध्यक्ष विजय काळे, माजी पसभापती चंद्रकांत पाटील, लक्ष्मण पाटील,भरत पगारे,गणेश गवळी,समाधान गव्हांडे,ज्ञानेश्वर युवरे,सरपंच गणेश माळी,संदीप बावसकर,उत्तम पाटील,बाळु बावस्कर, समाधान पाटील, साहेबराव पाटील,गोकुळ पाटील, हिंमत शिंदे, सर्जेराव पवार, भाऊसाहेब भालेराव,

आदींसह मराठा प्रतिष्ठानचे कार्यकर्ते व ग्रामस्थांनी पुढाकार घेतला होता.मराठा प्रतिष्ठानच्या कार्यकर्ते व सर्वांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. येथील नदीकाठच्या शेतात पाणी शिरून पिकांसह शेती खरडून पुराच्या पाण्यात वाहून गेले होते. यामुळे दिवाळीचा सणकसा साजरा करायचा? असा प्रश्न या

पूरग्रस्त कुटुंबांपुढे होता. त्यामुळे मराठा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोपान गव्हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम रात्री आठ वाजेपर्यंत गावात सुरूच होता...

# वसुबारस निमित्त अंजनाई गोशाळेत सत्यनारायण महापूजा व गोमातेचे पूजन सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक.युवक आधार**
**प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-** क्रांती जनहित बहुउद्देशीय विकास संस्था, आमखेडा संचलित अंजनाई गोशाळेत वसुबारसच्या निमित्ताने शुक्रवारी (दि. १७) सायंकाळी सत्यनारायण महापूजा व गोमातेचे पूजन मोठ्या भक्तिभावाने पार पडले. या धार्मिक सोहळ्याला गोभक्त, गोसेवक, ग्रामस्थ आणि विविध मान्यवरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात सत्यनारायण महापूजेने झाली. संस्थेचे अध्यक्ष संदीप इंगळे व उर्मिला इंगळे यांनी सपत्नीक पूजन करून धार्मिक विधी पार पाडला. त्यानंतर गोमातेचे पूजन पार पडले. पूजनाचा मान माजी नगरसेविका अनिता रशीद तडवी व माजी पंचायत समिती सभापती तथा आमखेडा गावच्या सरपंच नंदा आगे यांच्या हस्ते संपन्न झाला.

या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष ईश्वर इंगळे, सचिव दिलीप शिंदे, सहसचिव अनिल लोखंडे, संचालक ज्ञानेश्वर गाडेकर, अशोक ढगे, रुपाली लोखंडे, शारदा इंगळे, मीना गाडेकर, पद्मा शिंदे




आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच संजय आगे, सुनिल जोशी, राजू दामधर, गणेश कापरे, माजी नगरसेवक सिकंदर तडवी, रविराज गिरी, भारत हिरे, सुभाष चौधरी, अशोक चौधरी, चेतन सोनी, धर्मराज अथर्व इंगळे, मयुर शिंदे, रणवीर इंगळे यांच्यासह मोठ्या संख्येने गोभक्त उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर उपस्थितांनी गायींचे पूजन करून त्यांना गव्हाचे पदार्थ खाऊ घातले. गोसेवा आणि गोरक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारे विचार या वेळी मांडण्यात आले.

**कौतुकास्पद उपक्रम : सात वर्षीय हर्षिताचे गोप्रेम सर्वांसाठी आदर्श**

कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरली कु. हर्षिता सिकंदर तडवी ही सात वर्षांची लहानगी. तिने गेल्या एक वर्षापासून आपल्या दैनंदिन खिशातील पैशांतून जमा केलेले (गल्ल्यातील) पैसे वसुबारसच्या औचित्याने गोमातेच्या चाऱ्यासाठी अर्पण केले.या छोट्याशा पण मनाला स्पर्शून जाणाऱ्या कृतीमुळे हर्षिताचे गोमातेप्रती असलेले प्रेम व जिव्हाळा पाहून सर्व उपस्थितांनी तिचे भरभरून कौतुक केले. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनीही हर्षिताला शुभेच्छा देत तिच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# कु. संचिता राठोडची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत निवड




**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजु गायकवाड**

महाराष्ट्र राज्य क्रिडा व युवक सेवा संचालनालय, पुणे तसेच जिल्हा क्रिडा संकुल अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेचे आयोजन अमरावती क्रिडा संकुल येथे दि. १० व ११ आक्टोंबर २०२५ रोजी करण्यात आले होते. याu शालेय कुस्ती क्रिडा स्पर्धेमध्ये महात्मा मुंगसाजी आदिवासी शिक्षण संस्था पुसद व्दारा संचालित स्व. नामदेवरावजी मळघणे अदिवासी कनिष्ठ महाविद्यालय आश्रमशाळा, मरसुळ ता. पुसद जि. यवतमाळ येथील ४६ किलो वजन गटामध्ये कु. संचिता रविंद्र राठोड वर्ग ११ वी कला मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थीनीने फ्रीस्टाइल कुस्ती स्पर्धेत आपल्या गटातील प्रतीस्पर्धी खेळाडुस काही सेकंदात चित करुन विभागात प्रथम क्रमांक प्राप्त केला व खापोली जि. रायगड येथे दि. ०६ ते ०८ नोव्हेंबर २०२५ रोजी होणाऱ्या शालेय कुस्ती स्पर्धे करीता आपली पात्रता सिध्द केली. ती पुसद तालुक्याचे नेतृत्व अमरावती विभागा तर्फे करणार आहे. या कुस्ती खेळाडुस जय बजरंग व्यायाम शाळा, फुलवाडीचे प्रशिक्षक विश्वास चव्हाण, ईशान चव्हाण यांनी प्रशिक्षण दिले. तसेच तिला स्पर्धेकरीता मार्गदर्शन तीचे वडील रविंद्र राठोड, तसेच शाळेचे क्रिडा शिक्षक वाय. आय. परसुवाले व मुख्याध्यापक ए. जी. सैय्यद यांनी केले. आश्रमशाळा प्रेरणादायी शिक्षक, कुशल व्यवस्थापण व दुरदृष्टी पुर्ण नेतृत्व यांच्या आधारावर उच्च दर्जाच्या शिक्षणाची नवे मानक प्रस्थापीत करुण विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील प्रयत्नांना तेज दिशा देण्याचे कार्य करीत आहे.

शाळेची निरंतर प्रगती, शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व क्रिडा प्रगतीचा आलेख उंचावत ठेवण्यासाठी संस्थेचे आधारस्तंभमाजी मंत्री ॲड. शिवाजीराव मोघे यांनी यशस्वी विद्यार्थीनीचे अभिनंदन व कौतुक करुण शुभेच्छा दिल्या. एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प पुसदचे मार्गदर्शक प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर, संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र मोघे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर तडसे शाळेचे युवा संचालक लिलाधर मळघणे, प्राचार्य ए. जी. सैय्यद व त्याचे सहकारी उपस्थित होते.

# दिवाळी : उजळलेली घरं, पण अंधारलेलं मन!

भारतीय संस्कृतीतील प्रत्येक सण ही केवळ धार्मिक प्रथा नसून, ती समाजाच्या चेतनेचे प्रतिबिंब असते. दिवाळी हे त्या सर्व सणांमधले सर्वाधिक लोकप्रिय, सर्वाधिक प्रतीकात्मक आणि सर्वाधिक अर्थपूर्ण पर्व आहे. परंतु आजच्या काळात हा सण आर्थिक उपभोगवादाचा आणि सांस्कृतिक आडमुठेपणाचा उत्सव बनू लागला आहे. फटाक्यांचा आवाज वाढतोय, पण संवाद कमी होतोय; घरं उजळतात, पण माणसं मात्र अधिक एकाकी होत आहेत. या विरोधाभासावर विचार करणे आज आवश्यक आहे. दिवाळीचा मुळ अर्थ आहे. अंधःकारावर प्रकाशाचा विजय. अंधार म्हणजे अज्ञान, अन्याय, भ्रष्टाचार, असमानता आणि द्वेष; तर प्रकाश म्हणजे ज्ञान, न्याय, करुणा, आणि विवेक. आपल्या समाजात आज हे दोन्ही घटक पुन्हा एकदा आमनेसामने उभे आहेत. आपण डिजिटल युगात पोहोचलो आहोत, पण विचारांच्या अंधारातून अजून बाहेर आलो नाही. भ्रष्टाचाराच्या धुरात सत्य हरवतंय, आणि धर्माच्या नावाखाली द्वेषाचा फटाका फोडला जातोय. अशा वेळी दिवाळी आपल्याला आठवण करून देते. खरा प्रकाश म्हणजे विवेकाचा प्रकाश.



दिवाळीच्या दिवसांत बाजारपेठा उजळतात, पण त्याच वेळी समाजातील लाखो हात रिकामे राहतात. एका बाजूला जाहिरातींनी, ऑफर्सनी आणि विलासात जगणाऱ्या वर्गाची दिवाळी होते; तर दुसऱ्या बाजूला रोजंदारी गमावलेल्या, शेतकरी संकटात सापडलेल्या, आणि बेरोजगारीच्या अंधारात जगणाऱ्यांची दिवाळी निःशब्द असते. प्रकाशाचा हा असमतोल आपल्याला समाजातील आर्थिक अन्यायाची जाणीव करून देतो. खरं तर, दिवाळीचा सण आपल्याला "सामाजिक समतेचा प्रकाश" पसरवण्याची प्रेरणा द्यायला हवा. पण आज हा प्रकाश काहींच्या घरातच साठला आहे. आजचा भारत आर्थिक, तांत्रिक आणि राजकीयदृष्ट्या पुढे गेला असला तरी लोकशाहीचा दीप मंदावलेला जाणवतो. राजकारणात विचारांचा अंधार आणि मतांच्या विक्रीचा बाजार उजळलेला दिसतो. संविधानाच्या मूल्यांना दुय्यम स्थान देत असताना दिवाळीचा "सत्याच्या विजयाचा" संदेश अधिक अर्थपूर्ण वाटतो. आपण साजरे करतोय स्वातंत्र्याच्या प्रकाशातला सण, पण स्वातंत्र्याच्या मूल्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण होतंय. म्हणून दिवाळी आज फक्त उत्सव नाही; ती लोकशाहीतील विवेकाची चाचणी आहे.

दिवाळी म्हणजे फक्त भौतिक सुखाचा उत्सव नव्हे, तर तो संस्कृतीच्या सातत्याचा आणि नवतेच्या मिलाफाचा क्षण आहे. आज आपण पश्चिमेकडील उपभोग संस्कृतीचं अंधानुकरण करताना पारंपरिक मूल्यांना विसरतोय. दिवाळीचा मूळ हेतू 'आनंद वाटणं' हा होता, 'दाखवणं'नव्हे. आपल्या सणांच्या आत्म्याला परत मिळवणं हे आजचं सर्वात मोठं आव्हान आहे. आपल्या संस्कृतीचा आत्मा "सहभाजनात" आहे, "स्पर्धेत" नाही. दिवाळीच्या दिव्यांचा प्रकाश काही दिवस टिकतो; पण विचारांचा प्रकाश टिकवला, तर संपूर्ण समाज उजळतो.

या वर्षी आपण प्रत्येकाने एक संकल्प करू या. अंधानुकरणाऐवजी विचार करणे, खर्चाऐवजी करुणा वाढवणे, धर्माच्या नावावर द्वेष न पसरवणे आणि समाजात समतेचा दीप पेटवणे. दिवाळी हा सण नाही, ती आपल्या अंतरात्म्याची परीक्षा आहे. आपण खरंच प्रकाशाच्या बाजूने आहोत का? प्रत्येक वर्षी दिवे लावून आपण म्हणतो, "अंधार जावो, प्रकाश येवो." पण आजचा काळ विचारतो तो अंधार नेमका कुठे आहे? जर तो आपल्या अंतःकरणात, आपल्या समाजव्यवस्थेत, आपल्या राजकीय संस्कृतीत शिरला असेल, तर फक्त दिवे पुरेसे नाहीत. त्याकरिता विचारांचाही दीप पेटवावा लागेल. विचार, संवेदना आणि जबाबदारी यांनी उजळलेली दिवाळी, हीच खरी प्रकाशपर्वाची व्याख्या. आपण सर्वांनी ती अंगीकारावी, हीच शुभेच्छा!

"फटाके संपतात, पण विचारांचा प्रकाश कधीही मावळू नये;

कारण समाज वाचतो तो सणांनी नाही, तर विवेकाने."

- प्रवीण बागडे

# ज्येष्ठ नागरिकांची आगळीवेगळी दिवाळी

## पणत्या देत राखला सामाजिक सलोखा; ज्येष्ठांचा झाला सन्मान

**दैनिक युवक आधार**
**माणगाव - महेश शेलार**

"ज्योत से ज्योत जलाते चलो, प्रेम की गंगा बहाते चलो..." या अर्थपूर्ण ओळी जणू वास्तवात उतरल्या, जेव्हा तरुण विद्यार्थ्यांनी दुर्लक्षित ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात प्रकाश आणि आनंदाची किरणे आणली. दिवाळीच्या निमित्ताने सामाजिक सलोखा, एकता आणि प्रेमाचा संदेश देणारा हा आगळावेगळा उपक्रम सगळ्यांचेच मन जिंकून गेला आहे. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी कॉलेज ऑफ सोशल वर्क, निर्मला निकेतन (मुंबई) यांच्या फील्ड ॲक्शन प्रोजेक्ट 'प्रवास' अंतर्गत गोरेगाव पश्चिम येथील भगतसिंग नगर आणि विटभट्टी समुदायातील ज्येष्ठ नागरिकांसोबत "आंतरधर्मीय दिवाळी" साजरी करण्यात आली. विविध जाती, धर्म आणि पार्श्वभूमी असलेल्या सुमारे ५० ज्येष्ठ नागरिकांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.



कार्यक्रमाचे उद्घाटन दोन्ही समुदायांतील ज्येष्ठ नागरिक, कॉलेजच्या विस्तार केंद्रातील कर्मचारी आणि विद्यार्थी समाजकार्यकर्त्यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सामाजिक एकतेचा आणि सणाच्या सार्वत्रिकतेचा संदेश प्रभावीपणे व्यक्त झाला. या प्रसंगी कॉलेजच्या प्राचार्या डॉ.लिडविन डायस, विस्तार केंद्राचे संचालक श्री. क्लीटस झुझार्ट, आणि सहयोगी संचालिका मिस. निलीमा रॉड्रिग्ज प्रमुख पाहुण्यांच्या रूपाने उपस्थित होते. प्राचार्य डॉ.डायस यांनी आपल्या भाषणात दिवाळी सणाचे सामाजिक आणि मानवी महत्त्व अधोरेखित करत सर्वांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमातील सर्वात हृदयस्पर्शी क्षण म्हणजे — ज्येष्ठ नागरिकांनी स्वतः रंगवलेले दिवे एकमेकांना भेट म्हणून दिले. त्या पणत्यांनी केवळ प्रकाश नव्हे, तर परस्पर सन्मान, प्रेम आणि मैत्रीचा उजेड पसरवला. यानंतर रंगतदार खेळ, रांगोळी स्पर्धा आणि पारंपरिक गाण्यांवर गरबा नृत्य यांचे आयोजन करण्यात आले. ज्येष्ठांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि सभागृहात हास्य, टाळ्या आणि आनंदाचा माहोल पसरला. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर समाधानाचे आणि आनंदाचे तेज झळकत होते.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व ज्येष्ठांना भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. दिवाळी फराळ आणि अल्पोपहाराने या सोहळ्याची सांगता झाली. दुपारभरचा आनंद आणि एकतेचा अनुभव उपस्थितांच्या मनात चिरंतन ठसा उमटवून गेला. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाने एक महत्त्वाचा संदेश दिला — "म्हातारपण हे दुसरे बालपण असते, आणि त्या बालपणातही आपुलकी, प्रेम आणि सहवासाची ऊब द्यावी. "अशी दिवाळी — केवळ दिव्यांची नव्हे, तर माणसांच्या मनामनात प्रकाश पसरवणारी — खऱ्या अर्थाने साजरी झाल्याचे सर्वांना जाणवले.

## अनाथ ६० मुला-मुलींना फटाके, कपडे व मिठाई देऊन केली अनोखी दिपावली साजरी



**दैनिक युवक आधार**
**नांदेड वार्ताहर**

फटाका असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष धनराज मंत्री व धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर यांच्या संकल्पनेतून "अनाथ मुला-मुलींची अनोखी दिपावली" हा उपक्रम यंदा अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला.या उपक्रमाअंतर्गत ना.हेमंतभाऊ पाटील व आ.आनंदराव बोंढारकर यांच्या हस्ते 60 अनाथ मुला-मुलींना फटाके, नवीन कपडे आणि मिठाई वाटप करण्यात आली.हा कार्यक्रम रेल्वे स्टेशन रोडवरील गुरुद्वारा मैदानावरील फटाका बाजारामध्ये पार पडला. या वेळी व्यासपीठावर सतीश शर्मा,रहाटे साहेब,संतोष मानधने,प्रतापसिंग खालसा,गुरु भाई,विशाल फाजगे, सुषमा हुरणे,सुरेश शर्मा,संतोष भारती,लालबाजी घाटे व दिनकर सर यांची प्रमुख उपस्थिती होती.मान्यवरांचा शाल,पुष्पगुच्छ व मोत्याच्या माळ घालून सत्कार करण्यात आला.हा सत्कार धनराज मंत्री,आयुष मंत्री,गणेश मंत्री,अनिल मंत्री,सिद्धेश्वर पेटकर,महेश देबडवार, अनिकेत परदेशी,शुभम परदेशी, शुभम वट्टमवार,विशाल मुत्तेपवार, अजय ठाकुर,संदिप रायेवार,संजय गायकवाड,आनंद मुथा,शेख सादुला, शेख युसूफ,चिद्रावार,शेख अमजद, विजय मुथा व पियुष मंत्री यांनी केला.प्रास्ताविकात धनराज मंत्री यांनी फटाका व्यापाऱ्यांना दुकाने लावण्यासाठी येणाऱ्या अडचणींचा उल्लेख केला व त्यावर ना.हेमंतभाऊ पाटील यांनी सांगितले की,"अनाथांची अनोखी दिवाळी हा अतिशय स्तुत्य उपक्रम आहे. फटाका व्यापाऱ्यांना येणाऱ्या अडचणीबाबत मी स्वतः अधिकाऱ्यांशी चर्चा करणार आहे." तसेच आ.आनंदराव बोंढारकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "अशा उपक्रमांची गरज प्रत्येक ठिकाणी असून फटाका असोसिएशनच्या पाठीशी मी सदैव उभा राहीन."या वेळी सुमन मुलींचे बालगृह व लहुजी साळवे अनाथ आश्रम,धनगरवाडी येथील मुलांना चांगल्या प्रतीचे नवीन कपडे,मिठाईचे डबे व मुबलक फटाके देण्यात आले. या कार्यक्रमाचे रंगतदार संचलन ॲड. दिलीपभाऊ ठाकूर यांनी केले,तर आभार आयुष मंत्री यांनी मानले.दिपावलीच्या पहिल्याच दिवशी अनपेक्षितपणे मिळालेल्या भेटवस्तूंमुळे अनाथ मुला-मुलींच्या चेहऱ्यावर आनंद फुलून आला.हाकार्यक्रम यशस्वी करण्यासाठी फटाका असोसिएशनच्या सर्व सदस्यांनी मेहनत घेतली व उपस्थित सर्वांच्या चहा फराळा नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.अनाथ मुलांसाठी आगळावेगळा उपक्रम राबवल्याबद्दल संयोजक धनराज मंत्री व ॲड.दिलीप ठाकूर यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## तळेगाव सर्कलमधून जिल्हा परिषद निवडणुकीची तयारी – तरुण नेतृत्व म्हणून संदेश गायकवाड यांच्या उमेदवारीची चर्चा

**दैनिक युवक आधार**
**मुदखेड प्रतिनिधी–प्रकाश गवारे**

सामाजिक क्षेत्रात प्रभावी कामगिरी बजावत अल्पावधीत लोकमान्यता मिळवलेल्या तळेगाव सर्कलातील तरुण नेतृत्व संदेश गायकवाड (सिंधी) यांनी आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत तळेगाव सर्कलमधून उमेदवारी अर्ज भरण्याची घोषणा केली आहे. लोकसंपर्क, विकासाचा दृष्टीकोन आणि जनतेतला विश्वास या जोरावर ते निवडणूक रिंगणात उतरणार आहेत.

संदेश गायकवाड यांनी वयाच्या २०व्या वर्षी सामाजिक कार्याला प्रारंभ केला. शिक्षण घेत असतानाच समाजकार्यासाठी झटणारी त्यांची वृत्ती लक्षवेधी ठरली. एम.ए. पॉलिटिकल सायन्सचे शिक्षण घेत असताना सिंधी गावात वंचित घटकांच्या प्रश्नांवर त्यांनी ठोस भूमिका घेत अनेक समस्यांचे निराकरण केले. ग्रामस्थांनी त्यांच्यावर दाखवलेल्या विश्वासाच्या जोरावर ते ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून आले.



ग्रामपंचायत स्तरावर उल्लेखनीय विकासकामे

ग्रामपंचायत सदस्य म्हणून काम करताना संदेश गायकवाड यांनी खालील विकासकामे प्रभावीपणे पूर्ण केली –रस्ते बांधकाम, नाले, साफसफाई यांसारख्या मूलभूत सुविधांचा विकास

दिवाबत्ती योजना, कंपाऊंड वॉल उभारणी

स्वच्छ पाणी पुरवठ्यासाठी वॉटर प्लांटची स्थापना

निराधार, वृद्ध, अपंग, श्रावणबाळ योजना पात्रांना सरकारी योजनांचा लाभ

घरकुल योजना, पंचायत समितीमार्फत विविध विकास कामांचा पाठपुरावा

जनतेच्या अडचणी सोडवण्यासाठी नेहमी पुढाकार घेणारा संवेदनशील ग्रामनेता म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली.

**युवकांमध्ये लोकप्रिय नेतृत्व**

संदेश गायकवाड यांच्या कामाची दखल घेत वंचित बहुजन आघाडीने त्यांना नांदेड जिल्हा युवक आघाडीचे संघटक पद दिले. त्यांच्या संघटन कौशल्यामुळे उमरी तालुक्यात युवकांमध्ये मोठा जनसंपर्क निर्माण झाला.

सांस्कृतिक कार्यक्रमांतून सामाजिक संदेश

सलग दोन वर्षे नामविस्तार दिनाचे आयोजन

वामनदादा कर्डक जयंतीनिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन

सुप्रसिद्ध गायक अजय देहाडे आणि चेतन चोपडे यांचे गायन कार्यक्रम

कोविड काळात रुग्णालयात जाऊन रुग्णांना दिला मानसिक आधार

विकासासाठी कटिबद्ध – संदेश गायकवाड

तळेगाव सर्कलमधून लोकसेवेसाठी सज्ज होत असल्याचे सांगताना त्यांनी म्हटले –

"आम्ही आजवर जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होत विकासाचे काम केले आहे. येणाऱ्या काळात तळेगाव सर्कलच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा परिषद निवडणूक लढवणार आहे. जनता साथ देईल अशी पूर्ण श्रद्धा आहे."

संदेश गायकवाड यांच्या उमेदवारीमुळे तळेगाव सर्कलमधील निवडणूक अधिक रंगतदार होण्याची शक्यता आहे. तरुण नेतृत्व, विकासाची निष्ठा आणि जनतेतील स्वीकारार्हता या जोरावर त्यांनी प्रचाराची सुरुवात केली आहे.

## सामाजिक कार्यकर्ते माणिक भाऊ ढवळे दिग्रस (बु ) गणातून पंचायत समिती निवडणूक लढवणार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी/ प्रशांत ढवळे**


नांदेड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती चे बिगुल वाजले असून कुरूळा जिल्हा परिषद गट हा सर्वसाधारण साठी राखीव झाला आहे तर दिग्रस (बु )गण अनुसूचित जाती महिला साठी राखीव झाला आहे. त्यामुळे कुरूळा येथील सामाजिक कार्यकर्ते माणिक ढवळे हे दिग्रस गणातून त्यांच्या सौभाग्यवती ज्योतीताई माणिक ढवळे या भारतीय जनता पक्षा कडून निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट केले आहे व त्यांनी पक्षा कडे उमेदवारी ची मागणी केली आहे. माणिक ढवळे हे कुरूळा सर्कल मधील आंबेडकरी व बहुजन चवळीचे नेते व लोकप्रिय आमदार डॉ. तुषार भाऊ राठोड यांचे विश्वासु असून या भागा मध्ये सर्वसामान्य माणसासाठी अनेक सामाजिक कामे केली आहेत.तालुका स्थर वरील प्रशासकीय कामे असतील किंवा वैध्यकिय कामे असतील तसेच शासनाच्या विविध योजना चा लाभ थेट गरिब गरजू लोकांना मिळावा म्हणून सतत पाठपुरावा करत असतात. माणिक ढवळे व ज्योतीताई हे दांपत्य उच्चशिक्षित, प्रामाणिक व समाजाच्या सुख दुःखात सहभागी रहाणारे कार्यकर्ते असून शैक्षणिक आरोग्य, क्रीडा,सामाजिक राजकीय,व आध्यत्मिक सर्वच क्षेत्रात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे.



लोकांच्या मनात आपुलकी सेवा भाव आणि प्रामाणिक नेतृत्वचा ठसा उमटवीणारे माणिक ढवळे हे पंचायत समिती दिग्रस गणातून योग्य उमेदवार आहेत. असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे विविध क्षेत्रातील मान्यवर,महिला व युवक वर्गात त्यांच्या बद्धल उत्सहाचे वातावरण असून भाजपा पक्षा कडून संधी मिळाल्यास त्या संधीचे सोने करुन जनतेच्या विश्वासास पात्र ठरतील असा विश्वास सर्व सामान्य नागरिकांनी व्यक्त केला आहे.ते निवडणूक लढवणार असल्या चे निश्चित झाले आहे.

## भटक्या श्वान-मांजरींसाठी १२ कोटींचा खर्च अपेक्षित; नसबंदी, रेबीज लसीकरण मोहीम राबविणार



**दैनिक युवक आधार**

**ठाणे :** पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येशहरातील वाढत्या भटक्या आणि मोकाट श्वान-मांजरींच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी ठाणे महानगरपालिकेने ठोस निर्णय घेतला आहे. महापालिका आयुक्त तथा प्रशासक यांच्या मंजुरीने पाच वर्षांच्या कालावधीसाठी नसबंदी, रेबीज लसीकरण, उपचार आणि पकड मोहीम राबविण्यासाठी निविदा मागविण्यात आली आहे. या संपूर्ण कार्यक्रमासाठी १२ कोटी १६ लाख ९४ हजार २६३ रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

महापालिकेच्या अहवालानुसार, ठाणे शहराची लोकसंख्या सुमारे २६ लाख २८ हजार असून जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकांनुसार शहरात अंदाजे ५२ हजार भटके श्वान आणि मांजरी आहेत. सध्या महापालिकेकडे स्वतःचे प्राणी पकडण्याचे पथक नसल्याने नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ कारवाई करणे कठीण जात आहे.पालिका प्रशासनाने ही योजना 'पशुजन्म नियंत्रण नियम २०२३' नुसार राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या मोहिमेमुळे शहरातील नागरिकांना भटक्या प्राण्यांच्या त्रासातून दिलासा मिळण्याची आणि मानव-प्राणी सहअस्तित्वाचा समतोल राखण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दोन सत्रांमध्ये पकड मोहीम

या पार्श्वभूमीवर, प्रत्येक परिमंडळात दोन सत्रांमध्ये पकड मोहिमा राबविण्यासाठी ३० कुशल कामगार, दोन पर्यवेक्षक आणि दोन पशुवैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कामासाठी खासगी संस्थेची नियुक्ती करण्यात येणार असून, तिच्यामार्फत नसबंदी, लसीकरण आणि उपचाराची कामे केली जाणार आहेत. पहिल्या वर्षी सुमारे २.३३ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, पाच वर्षांच्या कालावधीत एकूण १२.१६ कोटी रुपयांहून अधिक निधी खर्च होईल. संस्थेच्या कामगिरीचा आढावा घेऊन दरवर्षी कार्यादेश नूतनीकरण केला जाणार आहे.

# मानवतेचा दीप लावू!



आपण वर्षभर विविध सण साजरे करतो, त्यात दिवाळी सणाला विशेष महत्व आहे कारण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो आपण पाच दिवस साजरा करतो. आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगात दिवाळी उत्साहात साजरी केली जाते म्हणूनच दिवाळीला सणांचा राजा म्हणतात. दिवाळी सारखा उत्साह इतर कोणत्याच सणात नसतो. दिवाळीत लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्याच उत्साहाला उधाण येते म्हणूनच गरीब असो वा श्रीमंत, राज महालात राहणारा राजा असो की झोपडीत राहणारा गोरगरीब प्रत्येक जण दिवाळी सण साजरा करतो. लहान मुलांसाठी तर दिवाळी म्हणजे पर्वणीच असते. शाळेला सुट्टी, नवे कपडे, नव्या वस्तू, किल्ला बनवणे, फटाके उडवणे, मिठाई, फराळ, मामाच्या गावाला जाणे अशा सर्व आवडत्या गोष्टी फक्त दिवाळीत करता येतात. दिवाळी म्हणजे लहान मुलांची चंगळ. केवळ लहान मुलेच नाही तर भावा - बहिणींचा देखील हा आवडता सण कारण दिवाळीतच भाऊबीज हा बहीण - भावांचा आवडता सण येतो.

सासरी असलेली बहीण भावाला ओवाळण्यासाठी दिवाळीत आवर्जून माहेरी येते. दिवाळी हा आबालवृद्धांचा आवडता सण.

दिवाळी सण म्हणजे प्रकाशाचा सण, दिव्यांचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या काळात आकाशकंदील, पणत्या, रांगोळी, नवी खरेदी, नव्या वस्तू, नवे कपडे, फटाके यांची रेलचेल. आताही या वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. २०२० आणि २०२१ या दोन वर्षात कोरोनाने जगभर धुमाकूळ घातला होता त्यामुळे या दोन वर्षात लोकांना मनासारखी दिवाळी साजरी करता आली नव्हती.

मागील दोन वर्षापासून दिवाळीवरील कोरोनाचे सावट नाहीसे झाले मात्र कोरोनामुळे अनेकांचा रोजगार हिरावला गेला त्यामुळे अनेकांनी साधेपणाने दिवाळी साजरी केली. मागील दोन वर्षापासून दिवाळीवर कशाचेही सावट नसल्याने लोकांना दिवाळी मनासारखी साजरी केली. महागाई वाढली असली तरी दिवाळीचा उत्साह कमी झाला नाही उलट वाढतच गेला. दिवाळी हा आनंदाचा, उत्साहाचा आणि प्रसन्नतेचा उत्सव असल्याने हा उत्साह यावर्षीही असाच कायम राहील असे वाटत होते मात्र ऐन दिवाळीच्या आधी झालेल्या अतिवृष्टीने या उत्साहावर पाणी पडले. राज्यातील शेतकऱ्यांवर आसमानी संकट आले. राज्यातील विविध भागात झालेल्या अतिवृष्टीने उभी पिके आडवी झाली. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी हवालदिल झाला. या संकटातून सावरण्याची ताकद शेतकऱ्यांना मिळो आणि त्यांची दिवाळी गोड व्हावी अशी प्रार्थना राज्यातील 13 कोटी जनता देवाजवळ करत आहे.

दिवाळी म्हणजे आनंदाचा दीपोत्सव.....!

बाहेर प्रकाशाचे दिवे पेटवायचे आणि हृदयातून ज्ञानाचे दिवे प्रज्वलित करायचे. अंतःकरणात अज्ञानाचा, विषमतेचा, अहंकाराचा अंधार असेल तर तो दूर करायच. ज्या प्रमाणे आकाशकंदील, पणत्या लावून बाहेरील अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते तसेच आपल्या अंतःकरणात असलेल्या अवगुणांचा अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते. प्रत्येक मनुष्याने शुभ चिंतन करून, शुभ विचार मनात आणून, शुभ विचार प्रकट करून जीवन प्रगल्भ आणि समृद्ध करावे हाच संदेश दिवाळी देते.

जीवनातून आसुरी शक्तीचा पराभव करण्यासाठी दैवी शक्तीचा वापर करावा. मानवाची सर्व धडपड जीवनात सुख आणि आनंद मिळवण्यासाठीच चाललेली असते. दुःख भोगल्याशिवाय सुखाची किंमत कळत नाही हे तत्वज्ञान सांगण्यासाठी ठीक; मात्र दुःखाची अनुभूती घेण्यास कोणालाही आवडत नाही. मनुष्य स्वभावातील हा स्थायीभाव ओळखूनच भारतीय संस्कृतीत सणांची निर्मिती केलेली असावी याचे भान ठेवूनच प्रत्येकाने सण साजरे करावेत.

गरीब, कष्टी, दीन, दुबळे, वंचित असा मोठा दुःखी वर्ग समाजात आहे. आपल्या घरी दिवाळी साजरी करताना त्यांच्याही घरी आनंदाचा एक दिवा लावावा म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर देखील आनंदाची रेषा पसरेल. या दुःखी, कष्टी लोकांच्या चेहऱ्यावर हास्य पसरवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्यच आहे. साने गुरुजी म्हणतात त्याप्रमाणे बाहेर अनंत दिवे पाजळून दिवाळी येत नसते. हृदयात प्रेमाच्या, मानवतेच्या पणत्या लावून आनंदाची उधळण करणाऱ्या या सणातून आपल्या जीवनात प्रकाश आणू या! अशी दिवाळी साजरी झाली तरच खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली असे म्हणता येईल अन्यथा नाही!

चला तर मग दीन दुबळ्यांचे दुःख वाटून घेऊ, मानवतेचा ओलावा देऊ, त्यांच्या पाठीवर प्रेमाचा हात फिरवू, त्यांच्या जीवनात सौख्य निर्माण करू. आपल्या ताटातील खाणे याला प्रवृत्ती म्हणतात, दुसऱ्याच्या ताटातील ओरबाडणे याला विकृती म्हणतात तर आपल्या ताटातील दुसऱ्याला देणे याला संस्कृती म्हणतात. चला तर मग आपण या दिवाळीच्या निमित्ताने आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करू. मानवतेचा दिप लावू!

**- श्याम ठाणेदार**